**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(दिनांक १९.०३.२०१६ ची सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली अर्थसंकल्पीय विशेष सभा)**

शनिवार, दि. ०२.७.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

<u>सर्व श्री / श्रीमती</u>

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| पांढरे स्नेहा सुधाकर | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खाँ इलीयास खाँ | आनेवार गंगासागर संदीप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शिला सुनिल | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| कनकदंडे मोहिनी महेशराव | वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजिया बेगम अयुब खान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपतराव भिवाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | यादव तुलजाराम गणेशलाल |
| खेडकर ज्योती महेंद्र | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजीतसिंघ पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| अ. फसीया फिरदोस | अ. सत्तार अ.गफुर |
| आसीया बेगम अ. हबीब बागवान | स. शेर अली स. महेबुब अली |
| कुरेशी चाँद पाशा खाजा | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल | लतीफा बेगम बु-हाण खान |
| किशोर किशनलाल यादव | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक रमेशराव सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| सौ.ललिता मुंकुंदरा बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजीराव |
| कदम विश्वास बालाजी | अङ बन शाम वामनराव |
| अल केसरी हसन बिन उमेद | काबरा रामनारायण रामदेव |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी अ,महापौर हे होते तसेच श्री समीर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (विकास), श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. स्मीता ठाकरे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री विजय मुंढे, प्र.उपायुक्त (महसुल), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता(साबांवि). श्री सुगीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महापौर** वंदेमातरमने सभेला सुरुवात करण्यात येते.

सुरवातील नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर.** स्थायी समितीची सभापती सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, आयुक्त, सर्व स.सदस्य, अधिकारी कर्मचा-याचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विरोधी पक्षनेता** तत्कालीन नगरपालिकेचे माजी मालमत्ता व्यवस्थापक व माजी विरोधी पक्ष नेता तथा नगरसेवक श्री दिपकसिंह रावत यांचे वडील कै .काशिनाथसिंह रावत यांचे दु:खद निधन झाले आहे .मी सभागृहास विनंती करतो की ,कै.काशिनाथसिंह रावत यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे त्यास आपण सर्वानी मान्यता दयावी अशी मी सभागृहास विनंती करतो.

**हबीब बागवान/शेर अली** मागे काही दिवसापुर्वी चेंबरमध्ये दम घुट्न दोन लोकांचा मृत्यू झाला आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी तसेच त्यांना मनपाचे साईट क्र 34 .मधील घर आणि दोन लाख रुपये आर्थिक मदत मनपाकेकडून देण्यात यावी अशी मी सभागृहास विनंती करतो.

**अब्दुल सत्तार** वरिल दोन्ही प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** तत्कालीन नगरपालिकेचे माजी मालमत्ता व्यवस्थापक व माजी विरोधी पक्ष नेता तथा नगरसेवक श्री दिपकसिंह रावत यांचे वडील कै .काशिनाथसिंह रावत यांचे दु:खद निधन झाले आहे .मी सभागृहास विनंती करतो की ,कै.काशिनाथसिंह रावत यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्तावास व मनपाच्या चेंबरमध्ये दम घुट्न दोन लोकांचा मृत्यू झाला आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी व मनपाकेच्या साईट क्र 34 .मधील घर आणि आर्थिक मदत मनपाकेकडून देण्यात यावी.

**ठराव क्रं. ०२** **ठराव**

घोणसे पाटील, मनपाकेतील माजी विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांचे वडील तथा मनपाकेतील माजी मालमत्ता व्यवस्थापक श्री काशिपाथसिंह रावत यांचे निधन झालेले असुन तसेच महेबुबनगर येथील ड्रेनेज लाईनची साफसफाई करतांना दोन नागरीकांचा निधन झालेला असुन या सर्वांना भावपुर्ण श्रध्दांजी हि नावाशमनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते अर्पण करते.

तसेच मनपाचे साईट क्र 34 .मधील ड्रेनेजचे काम करतांना दोन मजुर मृत्युपावले असल्याने त्यांचे वारसांना घर आणि प्रत्येकी दोन लाख रुपये आर्थिक मदत मनपाकेकडून देण्यास मान्यता देण्यात येते.

**हबीब बागवान** मागील दोन वर्षापासून ब्रम्हपुरी एरीयामधील बीएसयुपीचे इन्फ्राचे कामे झालेली नाहीत ती कामे जानिव पुर्वक पुर्ण केली जात नाही .कारण त्या ठिकाणी अल्पसंख्याकांची वस्ती आहे म्हणून कामे केली जात नाही काय याबाबतचा खुलासा करावा.

**तुलजेस यादव** या सभेमध्ये कत्तलखान्याच्या बाबत जो विषय आहे. तो विषय पास करण्यात येवू नये.

**अब्दुल सत्तार** महानगरपालिकेत नविन आयुक्त रुजू झालेले आहेत .त्यांचे प्रथम अभिनंदानाचा प्रस्ताव ठेवण्यात येतो .श्री समीर उन्हाळे साहेब यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाचा पदभार दिनांक 30.6.2016रोजी घेतला आहे त्यांचे अभिनंदन करतो व सभागृहास विनंती करतो की ,त्यांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावास मान्यता दयावी.

**आनंद चव्हाण** या अभिनंदनाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री समीर उन्हाळे साहेब यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाचा पदभार दिनांक 30.6.2016रोजी स्विकारला आहे .त्यांचे अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात येतो.

**ठराव क्रं. ०२/१** **ठराव**

मा .श्री समीर उन्हाळे हे दिनांक 30.6.2016रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाचा पदभार स्विकारला आहे ,त्यांचे अभिनंदन ही नावाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजूरी देते.

**अब्दुल सत्तार** ब्रम्हपुरी एरीयातील बीएसयुपीचे मागील दोन वर्षापासून कामे बंद आहेत .त्यासाठी शासनाने रुपये 95कोटीचा निधी दिला आहे .एवढा निधी देवूनही ब्रम्हपुरी एरीयातील इन्फ्राची कामे झाले नाहीत . सर्वांची भावना आहे की ,त्या ठिकाणचे इन्फ्राचे कामे झाले पाहीजे .मला अशी माहिती मिळाली की , 600घरे बीएसयुपीचे ही गरीब लोकांना मिळणार होती ती परत गेली आहेत .ती 600घरे गोर गरीब लोकांना मिळाली असती तर त्याचा फायदा जनतेस झाला असता ,ती घरे परत का गेली ? कोणी घरे परत केली .याबाबतचा सर्व निधी शासनाचा होता .सर्व साधारण सभेसमोर का आणले नाही . सर्व साधारण सभेने डीपीआरला मान्यता देते मग परस्पर घरे का परत करण्यात आली. शासनाचा निधी होता त्याचे युटीलाईज करण्यात आला नाही .याचा प्रथम खुलासा करण्यात यावा .मा .आयुक्त साहेब यांनी या एरीया माहिती नाही .त्यांनी या भागाची पहाणी करुन घ्यावी .त्याचे एरीयाचे पुन्हा सर्व्हे करावा पैसे का परत पाठविले ,कोणी पैसे परत केले याची चौकशी करण्यात यावी .या भागात पावसाच्या पाण्यामुळे मोठया प्रमाणात चिखल झालेला आहे .त्या चिखलामुळे त्या ठिकाणी जाता येत नाही .एखादयाचा मृत्यु झाला तर त्याला पलगांवर घेवून जावे लागते ,इतकी वाईट परिस्थिती आहे .या एरीचा एक दौरा सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेसह करावा व त्या ठिकाणचे इन्फाचे कामे त्वरीत चालू करावे ,अशी आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे.

**स. शेर अली** 1678घराची मंजूर करण्यात आली होती 1100घरांना मंजूरी देवून कामे चालू करण्यात आली आहेत .उर्वरीत घरे सर्व साधारण सभेची मान्यता न घेता परत केले आहेत हे 1100घराचा जो इन्फ्रा होता 15 .कोटीचा इन्फ्रा होतो .तो इन्फ्रा मागील दिड वर्षापासुन का पुर्ण करण्यात येत नाही .काय आमच्या सोबत पक्षपात करण्यात येत आहे काय ? याबाबत आमच्या मनामध्ये शंका आहे व लोकामध्ये रोष आहे .म्हणून मा .आयुक्त साहेबांना माझी आपणास विनंती आहे की , ब्रम्हपुरी एरीयाची इन्फ्राची कामे त्वरीत सुरु करण्यात यावी ,अशि माझी विनंती आहे.

**हबीब बागवान** कंत्राटदारास किती दंड लावला आहे याचा देखील खुलासा करण्यात यावा.

**महापौर** ब्रम्हपुरी एरीयाला मी स्वत :भेट दिलेली आहे त्या एरीयाची कामे करणे अत्यंत गरजेचे आहे .जसे श्री अब्दुल सत्तार ,श्री स. शेर अली व श्री हबीब बागवान यांनी सांगीतल्या प्रमाणे त्या एरीयातील इन्फ्राची कामे तातडीने हाती घेणे गरजेचे आहे .या भागातील कामे सुरु करण्यासाठी आयुक्तांना निर्देश देते की ,त्यांनी या एरीयातील इंन्फ्राची कामे त्वरीत सुरु करावी.

**उमेश चव्हाण** इतर भागामध्ये इन्फ्राची कामे थांबलेली आहेत ती कामे सुध्दा करण्यात यावी.

**हबीब बागवान / स. शेर अली** : ब्रम्हपुरी एरीयातील इन्फ्राची कामे त्वरीत सुरु करण्यात यावे .अशी विनंती आहे.

**अभिषेक सौदे** जुना कौठा ,असर्जन, असदवन हे भाग मनपाकेत साल सन 1997ला महानगरपालिकेत समाविष्ठ झालेला आहे .या भागामध्येविकासाची कामे करण्यात आलेली नाही आणि शासनाकडून 97कोटीचा निधी प्राप्त झाला आणि त्या एरीयाचे कामे करणेत यावेअसा पाठपुरावा करण्यात येत आहे .माझ्या एरीयातील जुना कौठा ,असर्जन ,असदवन या भागची कामे केव्हा करणार आहात याचा खुलासा करण्यात यावा.

**स. शेर अली** आमच्या एरीयाबाबत आपणास बोलण्याचा अधिकार नाही.

**उमेश चव्हाण** तुम्ही तुमचे कामे असतील तर ते काम सुचवा .इतर वार्डाचे कामाबाबत बोलू नये.

**महापौर** आपण सर्व स. सदस्य आप आपसात चर्चा करु नये काय प्रश्न आहेत ते विचारावे.

**विरोधी पक्षनेता** स .सदस्यांचा प्रश्न काय हे प्रथम समजून घ्यावे .त्यानंतर उत्तर दिले पाहिजे त्याचा पुर्णहोवू देत नाही .मध्येच कोणीतरी बोलते हे योग्य नाही .स .सदस्यांना सर्व साधारण सभेमध्ये बोलण्याचा अधिकार आहे .त्यांना बोलू दिले पाहिजे अशी महापौर महोदयांना विनंती आहे. श्री उमेश चव्हाण यांनी का बोलावे .श्री उमेश चव्हान यांना प्रश्न विचारला नाही हा प्रश्न मा. महापौर यांना विचारला आहे .श्री चहाण यांनी उत्तर का दयावे .

**विनय गुर्रम** आम्हास तुम्ही थांबविण्यासाठी सांगता आणि आपल्या नगरसेवकांना बोलणे थांबवावे.

**महापौर** श्री अभिषेक सौदे आपण जो प्रश्न विचारला आहे तो प्रश्न मला समजला आहे आपण खाली बसावे.

| | |
|---|---|
| **विरोधी पक्षनेता** | श्री उमेश चहाण यांना उत्तर देण्यासाठी सांगावे आपणास का उत्तर येत नाही असे समजावे काय . मा .महापौर महोदया ,आपण ठरवा की ,उमेश चव्हाण यांनीच उत्तर दयावे. |
| **महापौर** | तुम्ही कोण आहात आणि हा आपणास कोणी अधिकार दिला आहे .हे आपले बोलने योग्य नाही. हा त्यांचा अधकार नाही आपण प्रथम खाली बसावे. अशी सुचना विरोधी पक्ष नेता यांना केली. |
| **अशोक उमरेकर** | आपण विरोधी पक्ष नेता यांना आपण कोण आहात असे म्हणू शकत नाही .त्यांना बोलण्याचा अधिकार आहे .असे आपण बोलू शकत नाही. |
| **विनय गुर्रम** | सभागृह नेत्याने बोलावे .इतर नगरसेवकाने बोलू नये ,सभागृह नेता असते वेळी आपण बोलू नये. सभागृह नेत्याने त्यांच्या नगरसेवकांना खाली बसण्यासाठी सांगावे. |
| **बाळासाहेब देशमुख** | उमेश चव्हाण यांनी मा .महापौरांची बोलण्याची परवानगी घेतली होती काय .परवानगी नसतांना आपण कसे बोलत आहात .परवानगी नसतांना कसे बोलतात. |
| **महापौर** | श्री अभिषेक सौदे आपल्या प्रभागाची पूर्ण पाहणी करुन त्यावर निर्णय घेता येईल प्रथम आपण आपल्या जागेवर बसावे. |
| **अभिषेक सौदे** | आम्ही काय करावे ,माझ्या वार्डाचे कामे होत नाही आपण उत्तर दिले त्या उत्तराने माझे समाधान झाले नाही. त्यामुळे मी बसणार नाही. मला समाधान कारक उत्तर पाहीजे. |
| **महापौर** | आपण आपल्या जागेवर बसल्यानंतर आपणास समाधान कारक उत्तर देण्यात येईल .सर्व सदस्यांनी एकमेकाच्या प्रश्नाला आपण कोणीही उत्तर देवू येवू नये अशी सभागृहातील सर्व सदस्याना सुचना आहे .या सुचनेचे सर्वानी पालन केले पाहिजे .मा .आयुक्त महोदय हे नविन आहेत कोणीही वातावरण गढूळ करु नये ,याची सर्वानी दखल घ्यावी. |
| **विरोधी पक्षनेता** | स. सदस्य हे आपणास प्रश्न करीत असतात इतर सदस्यांनी उत्तर देवू नये. |
| **महापौर** | आता मी सर्व सदस्यांना सुचना केली आहे .ते उत्तर देणार नाहीत. प्रश्नाचे उत्तर मी देणार आहे. |
| **उमेश चव्हाण** | मी माझ्या वार्डाचे विकासाबाबत मला मत मांडावयाचे आहे मला परवानगरी देण्यात यावी. जर माझ्या प्रभाग सोडून ब्रम्हपूरी नांव घेवून सभागृहाची दिशाभुल करीत आहेत हे योग्य नाही .इन्फ्राचे कामे थांबलेले आहेत ती सुध्दा इन्फ्राचे कामे झाले पाहिजे .गोरक्षण ,लालवाडी ,श्रावस्तीनगर याठिकाणचे इन्फ्राचे काम करावयाचे शिल्लक राहीले आहे. |
| **रजिया बेगम** | महीलांना पहीला अर्ध्यातास सभागृहाने ठरवून दिला आहे ,महीलांना बोलू देणार की नाही .आपणास विनंती आहे की ,महिलांना बोलू दयावे. |
| **करुणा जमदाडे** | माझा प्रभाग क्रंमाक 40असून या प्रभागात घरकुल झालेले आहेत. परंतू बीएसयुपीचे इन्फ्राचे कामे झालेली नाहीत. ती कामे सुध्दा त्वरीत पुर्ण करण्यात यावी. त्या ठिकाणच्या लहान मुलाना , महिलांना घराबाहेर पडता येत नाही. किती दिवस झाले आहे ,इन्फ्राची कामे काही पुर्ण झालेली नाहीत .मेन्टनसची कामे झालेली नाहीत .सर्व सभागृहाची ही मागणी आहे .ज्या ठिकाणी कामे करणे गरजेचे आहे त्याचा प्राधान्य क्रम ठरवून ती पूर्ण करण्यात यावी . |
| **फारुख अली खाँ** | बीएसयुपीचे कामे 2007पासून चालू आहेत .ती कामे काही पुर्ण झालेली नाहीत .फक्त आपण खुलासा घेण्यातच आहोत .हे आम्ही ऐकत आहेत की ,खुलासा घेण्यात येईल .खुलास्यावर खुलासा घेण्यात येईल असेच सांगण्यात येत आहे. हा खुलासा घेणे बंद करावे. कामे पुर्ण कधी होतील हे सांगावे .रिझल्टचे काय आहे ते सांगा. 6ते 7वर्षाचे घराचा विषय आहे .कित्येक वर्षापासून कामे झाले नाहीत .घराचे छत गळत आहेत. पावसाचे पाणी त्या ठिकाणी पडत आहे .तरीही कामे पूर्ण झालेली नाहीत .इन्फ्राचे कामे त्वरीत सुरु करावे. |
| **महापौर** | मा. आयुक्त हे खुलासा करतील. |
| **आयुक्त** | स. महापौर महोदया, सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य आजच्या पहील्या बैठकीमध्ये आपण माझे स्वागत केले याबाबत मी आपला आभारी आहे .पहीला प्रश्न ब्रम्हपुरी एरीयामधील बीएसयुपीच्या विकास कामाच्या संदर्भातील आहे .बीएसयुपी योजना ही एक अभियान आहे ते केंद्र सरकारचे अभियान आहे. या योजनेत घरकुल व इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करावयाचे होते .त्या अभियांनाच्या निकषाप्रमाणे शहरातील ज्या ज्या भागामधील इन्फ्रास्ट्रक्चरचे कामे करावयाचे शिल्लक राहील आहेत ते या अभियानाच्या निकषास अनुसरुन शहरातील सर्व विकासाची कामे त्या भागाची व्हिजीट करुन घेवून त्या भागातील कामे पुर्ण करण्यात येतील. |
| **अब्दुल सत्तार** | बजेटची मिटींग आहे .बजेटच्या मिटींगवर चर्चा करण्यात यावी. |
| **विरोधी पक्षनेता** | अब्दुल सत्तार साहेब एक महत्वाचा विषय आहे ,आपल्या काळातला विषय आहे तो सभागृहाने एकुण घ्यावा .वजीराबादमधील मटन मार्केटची जागा आहे .त्या जागेचा मनपा मनपा सर्व साधारण सभेने ठराव करुन दिला होता .आणि त्या ठरावात शासनाची परवानगी घेण्यात यावी .ठरावात नमुद असतांना सुध्दा शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही .शासनाची मान्यता न घेता जागेची रजिस्ट्री देखील झालेली आहे .ही रजिस्ट्री माझ्याकडे आहे .अशा जमीन घोटाळयामध्ये खुप-खुप अधिकारी व मंत्री सुध्दा गेलेले आहेत आणि घरी बसलेली आहेत आणि हा फार मोठा घोटाळा आहे .जे की मार्केटमध्ये जागेची किंमत 60ते 65लाख रुपयाची किमंत आहे .ती जागा कवडीमोल किंमतीने विक्री केलेली आहे .सात लाख रुपयास विक्री केली आहे .मा .सुशिल खोडवेकर साहेबांनी एक पत्र काढले होते की ,जन्म-मृत्यूचे प्रमाणपत्रसाठी टॅक्स भरणा करावा म्हणुन किरायादाराने देखील टॅक्स भरावा लागत होता .यात टॅक्स सुध्दा भरुन घेतलेला नाही .कालच्या 20 तारखेमध्ये मी पत्र दिले होत ,तर २० तारखेमध्ये टॅक्स भरुन घेतला आहे .अशा अधिका-यावार कार्यवाही करावी म्हणून एक महीण्यापुर्वी पत्र व्यवहार करीत आहे .आतापर्यत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही .आपण कार्यवाही करणार आहात याचा खुलासा दयावा .पत्र देणारे एकच व्यक्ती पत्र रिसीव्हड करणारे एकच व्यक्ती माझेकडे संचिका आहे .ती संचिका आपल्याकडे दिलेली आहे .काल मा. जिल्हाधिकारी साहेबाकडे या प्रकरणात माझी हेरींग सुध्दा झालेली आहे .यामध्ये मी परिशिष्ठ “अ” व “ब” सुध्दा दिलेले आहे. माझे परिशिष्ठ “ब” मध्ये पुर्ण आक्षेप दिलेले आहेत .त्या |

आक्षेपावर अदयापपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही .यावर आपण काय कार्यवाही करणात येणार मा .आयुक्त साहेब हे सांगावे .माझ्या पहील्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा .

**महापौर** मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**आयुक्त** मा. महापौर महोदया, सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य जो काही प्रश्न विचारण्यात आलेला आहे मनपाकेत जे काही काम झाले आहे ,काम होणार आहे ,करण्यात येणार आहे ते नियमाप्रमाणेच होईल. ज्या कांही नियम बाहय गोष्टी झाल्या असतील तर त्याची पहाणी ,छाणनी करुन त्या दुरुस्त्या केल्या जातील .त्यात कोणी हेतू पुरसर जबाबदार असतील तर त्यांचेवर आवश्यकती शिस्त भंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

**विरोधी पक्ष नेता** एखादा नगरसेवक जर बांधकाम करत असले तर त्याचे नगरसेवक पद रद्द का करण्यात येवू नये याबाबतचे त्याला त्वरीत नोटीस पाठविण्यात येते की ,आपले नगरसेवक पद रद्द का करण्यात येवू नये .एवढी मनपाची जागा विकण्याचा अधिका-यांना कोणी दिला. त्यांना दोन ओळीचे पत्र देखील देण्यात आलेले नाही. याबाबतचा खुलासा मा .आयुक्त साहेब यांनी करावा .का कशासाठी ,का त्यांना तुम्ही पाठीशी घालता हाच अर्थ आम्ही समजावयाचा का ?

**महापौर** आयुक्तांनी खुलासा करावा.

**आयुक्त** मा. महापौर महोदया, सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य दोन विषय वेगळे आहेत .जी बेकायदेशीर कार्यवाही झाली असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे हे मी यापुर्वीच सांगीतले आहे . हा विषय आपण माझे पुढे आणलेला आहे. त्या विषयाची पाहणी ,छाणनी ,तपासणी करण्यात येईल यात काही बेकायदेशीर बाब झाली तर कार्यवाही निश्चीत केली जाईल.

**विरोधी पक्ष नेता** मा. आयुक्त साहेब आपण या अधिका-यावर काय कार्यवाही करणार हे सांगावे .आता मुंबईमध्ये जमीन घोटाळयामध्ये मागचे मंत्री गेलेले आताचे मंत्री गेलेले आहेत .हा प्रकार तसाच नाही का ? तुमचे मंत्री देखील होते.

**विनय गिरडे** वैयक्तीक कोणी विषय बोलू नये.

**विनय गुर्रम** विरोधी पक्ष नेत्यांने जो प्रश्न मांडला आहे त्या अधिका-यावर आपण काय कार्यवाही करणार याचा खुलासा करण्यात यावा.

**अब्दुल सत्तार** विरोधी पेक्ष नेता यांनी जो प्रश्न मांडला आहे त्या प्रश्नावर आपण मनापाकेच्या हिताच्या दृष्टीने आपण कार्यवाही करावी ,वजीराबाद मध्ये चार एकर जमीन मनपाची आहे त्या जागेवर लोकांनी अतिक्रमन केलेले आहे .त्यावर आपण चौकशी करुन येणा-या सर्वसाधारण सभेमध्ये तो चौकशी अहवाल सादर करावा .सर्वच जागेवर बुलडोजर लावण्यात यावे.

**विनय गुर्रम** मा. आयुक्त साहेब हा चार एकरचा विषय वेगळा विषय आहे .तो विषय हा अतिक्रमनाचा आहे . याप्रकरणात अधिकारी दोषी आहेत त्या अधिका-यावर आपण काय कार्यवाही करणार हे सांगावे. आपण चुकीची दुरुस्ती करणार आहात हे सत्य आहे .पण ज्याने चुक केली त्यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा करावा .एखादया इंजीनिअरने काम केले नाही तर त्याला त्वरीत निलबींत करण्यात येते .एखादया पाणी पुरवठयाच्या वसुली लिपीकांने पैसे खाले तर किंवा पैशाचा अपहार केला तर त्याला त्वरीत निलबिंत करण्यात येते .मग तर हा जमीन घोटाळा आहे .त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा करण्यात यावा.

**बाळासाहेब देशमुख** एखादा नगरसेवक त्याचा वार्डाचा प्रश्न घेवून गेला तर त्यांच्यावर 353नुसार कार्यवाही करण्यात येते .एवढया मोठा भ्रष्टाचाराला आपण पाठीशी घालता.

**विरोधी पक्ष नेता** मा. आयुक्त महोदय ,हे मंत्रालयात राहीलेले आहेत त्यांनी सखेल चौकशी करुन दोषी अधिका-यावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. या प्रकरणात साक्षीदार म्हणुन आपल्याच विभागाचे कर्मचारी आहेत त्यांच्यावरही कार्यवाही करावी.

**विनय गुर्रम** साक्षीदार हे मनपाचे कर्मचारी आहेत .त्यांना सुध्दा निलबिंत करण्यात यावे .चौकशी पुन्हा करा . प्रथम संबधीत कर्मचारी यांना प्रथम निलबिंत करावे.

**बाळासाहेब देशमुख** जे दोषी आहेत त्यांना आता निलबिंत करावे जर ते दोषी नसतील तर त्यांना आम्ही सन्मानाने कामावर रुजू करुन घेवू.

**विरोधी पक्षनेता** मा. आयुक्त महोदय साहेब आम्ही खोटे बोलत असलो तर कागद तर खोटे बोलणार नाहीत ना ? मी आपल्याकडे सगळे कागदपत्र दिलेले आहे .त्यानुसार निर्णय घेण्यात यावा ,एक महीना झाला आहे का कार्यवाही होत नाही.

**सभागृह नेता** सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झालेला आहे .त्या ठरावानुसार ती जागा लीजवर किंवा विक्री करुन देण्यात यावी असा ठराव पारीत झाला होता या प्रकरणात काही अनियमीतता झाली असेल तर आणि यात कोणी कर्मचारी दोषी असेल तर त्यांच्यावर निश्चीत कार्यवाही झाली पाहीजे .या प्रकरणात काही त्रुटी असलयास त्यावर आपण कार्यवाही करणार आहात ,पण त्यांची अशी मागणी आहे की त्यांना आजच निलबिंत करण्यात यावे .मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करण्यात यावा की , याबाबत काय कार्यवाही करणार आहेत.

**विरोधी पक्ष नेता** संबधीत अधिकारी हे रजिष्ट्रीमध्ये आहेत त्यात कोण – कोण गुंतलेले त्याचा उल्लेख रजिष्ट्रीमध्ये आहे त्यांना निलबिंत करावे.

**बाळासाहेब देशमुख** शासनाचा अभिप्राय घेतला आहे काय ? त्यांना रजिस्ट्री करुन देण्याचे अधिकार आहेत काय ? जर मग शासनाचा अधिकार असेल तर त्याच्यासाठी शासनाचा अभिप्राय घेतला काय याचा खुलासा करण्यात यावा.

**विरोधी पक्ष नेता** आता सभागृहात संचिका मागविण्यात यावी आणि आताच संबधीताना निलबिंत करण्यात यावे . संबधीतास निलबिंत केल्याशिवाय सभा चालणार नाही .प्रथम निलबिंत करावे.

**विनय गुर्रम** दोषी आढळून आले नाही तर त्यांना याच सभागृहात सन्मानाने परत घेवू.

| | |
|---|---|
| **विरोधी पक्ष नेता** | ही जमीन कशासाठी आरक्षीत होती .संबधीतानी या जागेची डीपी प्लॉनमध्ये काय स्थिती आहे याची विचारपुस नगररचना विभागास केली काय ? संबंधीत अधिकारी यात दोषी आहेत त्यांच्यावर कार्यवाही करावी. |
| **गणपत धबाले** | एखादया मनपा सदस्याने मनपा कामात हेराफेरी केली तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येते . पेपरला बातम्या येतात. एवढे मोठे प्रकरणे होवून त्याबाबत काहीच कार्यवाही का करण्यात येत नाही .अधिकारी कार्य झोपले आहेत काय ? संबंधीतास नोटीस का दिली नाही. |
| **विरोधी पक्षनेता** | मा .सुशिल खोडवेकर साहेबांनी एक परिपत्रक काढले होते .सर्व प्रमाणपत्रावर मनपाचा कर आहे तो भरुन ध्यावा .या अधिका-याने कर भरला नाही .गरीबाला एक न्याय श्रीमंताला एक न्याय ही परिस्थीती आहे .कायदयामध्ये तरतूद आहे .या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| **महापौर** | आयुक्त साहेब खुलासा करतील. सर्वाचे म्हणने ऐकु दयावे. |
| **विनय गुर्रम** | सर्व पक्षीय मागणी हीच आहे. |
| **बाळासाहेब देशमुख** | आम्ही एका विषयाला धरुन बोलत आहोत तर आम्हाला आपण खाली बसवतात हे बरोबर नाही. |
| **स.सरजितसिंघ गिल** | आता मा. आयुक्त साहेबांनी घोषना केली आहे की ,आता संचिका माझेकडे चौकशीसाठी आलेली आहे. यापूर्वीचे आयुक्त खोडवेकर साहेबांवर जसा विरोधी पक्ष नेत्याचा विश्वास होता .या आयुक्तावर ही आपण विश्वास ठेवावा .त्यांच्या चौकशीवर भरोसा ठेवावा अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करतो .तसेच 2014मध्ये लिजचा ठराव झाला आणि 2015मध्ये कायम झाला .त्यावेळी माझे मित्र विरोधी पक्ष नेता यांनी त्यावेळी काहीच आक्षेप घेतला नाही. |
| **विरोधी पक्षनेता** | माजी महापौर तथा जेष्ठ नगरसेवक श्री सत्तार भाई कोणत्याही पक्षाचे असु दया .आम्ही त्यांना महापौर म्हणून स्विकृत केले होते हा प्रस्तावाच्या अनुषंगाने पारीत झालेला ठरवात शासनाची मान्यता घेण्यात यावी असा नमुद होता परंतु प्रशासना मार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविला नाही. |
| **स.सरजितसिंघ गिल** | शासनाकडे प्रस्ताव पाठविला पाहीजे .या प्रकरणाची चौकशी झाली पाहीजे .दोषी आढळल्यावर त्यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित करावी. आज आपण आयुक्तावर भरोसा ठेवावा ,अशी आमची विनंती आहे. |
| **अब्दुल सत्तार** | बजेटचा विषय आहे ,बजेटबाबत चर्चा करण्यात यावी. |
| **विरोधी पक्षनेता** | मा. आयुक्त साहेबांनी या प्रकरणाचा प्रशम खुलासा करावा की ,या प्रकरणात दोषी अधिका-यावर कार्यवाही प्रस्तावित करावी .माझेकडे संचिका आहे .मी जर खोटे बोलत असेल तर कागद तर खोटे बोलणार नाहीत .सतार भाई मा .महापौर यांनी ठराव करुन दिलेला आहे .हा प्रस्ताव शासनाकडे पाठवा म्हणुन पण हे प्रकरण शासनाकडे पाठविलेले नाही. |
| **अशोक उमरेकर** | संबंधीत प्रश्नाचे उत्तर सभागृहाला मा. आयुक्त साहेबांनी दयावे अशी विनंती आहे .कोणत्याही पक्षाचा नगरसेवक या प्रश्नावर बोलता कामा नये . |
| **महापौर** | आयुक्त हे खुलासा करतील. |
| **आयुक्त** | मा. महापौर महोदया ,या प्रकरणात काही त्रुटी आढळल्या असतील त्या दुरुस्त करण्यात येतील . नबंर दोन यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर आवश्यकती शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. |
| **विनय गुर्रम** | या प्रकरणाचा आपणास अभ्यास चांगला झालेला आहे .कागदपत्राच्या आधारे संबंधीत अधिका-यास ताबडतोब निलबिंत करुन त्याची चौकशी करण्यात यावी .चौकशीत अपराध असल्यास त्यांना याच सभागृहात सन्मानाने परत घेवू. |
| **विरोधी पक्षनेता** | मा. आयुक्त साहेब आपण संबधीतास पाठीसी घालण्याचे दिसत आहे .कागद तर खोटे बोलणार नाहीत मी रजीष्ट्री कार्यालयातून रजीष्ट्री काढली आहे. |
| **बालासाहेब देशमुख** | भ्रष्टाचाराला आपण पाठीशी घालता काय ? |
| **अशोक उमरेकर** | 15दिवसात आपण चौकशी करा आणि तात्काळ निलबंनाची कार्यवाही करा. |
| **उमेश चव्हाण** | मा. आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे .एवढी घाई कश्याकरीता 15दिवसात चौकशी करुन निलबिंत करावे ,एवढी घाई का ? |
| **बालासाहेब देशमुख** | तात्काळ निलबींत करावे. |
| **उमेश चव्हाण** | आपण 15दिवसात निर्णय घेवू शकतात काय हे आयुक्त साहेबांनी सांगावे. |
| **बालासाहेब देशमुख** | या सर्व प्रकरणावरुन असे दिसून येते की ,कॉग्रेस भ्रष्ठाचाराला पाठीशी घालते .असा आमचा आरोप आहे .जमिनीची काय खोटी गोष्ट आहे काय ? हे सांगावे. |
| **अशोक उमरेकर** | या प्रकरणात सदस्यांचा कीती वाटा आहे हे सांगावे अशी मला शंका येत आहे. |
| **अब्दुल सत्तार** | विषयपत्रिका चालू करावी अशी माझी विनंती आहे .एका विषयावर चर्चा झाल्यानंतर पुन्हा चर्चा का करण्यात येत आहे .आयुक्तांनी खुलासा केलेला आहे.आता विषय पत्रिका पास करण्यात यावा . बजेटवर चर्चा करावी .मा .महापौर मॅडम आम्ही उपासामध्ये आहो .त्यासाठी बजेटवर चर्चा करण्यात यावी .केवळ आम्ही गप्पा करण्यासाठी आलेलो नाही. |
| | **गोंधळ सुरु झाला.** |
| **महापौर** | या प्रकरणात मा .आयुक्त यांनी खुलासा केलेला आहे .त्यावर वांरवार प्रश्न करण्यात येवू नये. |
| **उमेश चव्हान** | एकाच प्रकरणात किती वेळा खुलासा करण्यात यावा .एकदा खुलसा दिलेला आहे पुन्हा देण्याची गरज नाही. |
| **बालासाहेब देशमुख** | बेशिस्त नगरसेवकांना निलबींत करण्याची मी महापौरांना विनंती करतो. |
| **नवल पोकर्णा** | माझ्याही प्रभागाचा गेळया 3वर्षापासुनचा विषय आहे .झोनला पत्र दिले आहे त्या पत्रावर काहीही कार्यवाही झालेली नाही .त्या अधिका-यांवर काय कार्यवाही करणार याचा खुलासा आयुक्त साहेबांनी करावा. |
| **विनय गुर्रम** | मा. महापौर मॅडम, तुमच्या पक्षाचे माजी महापौर हे डायसवर येवून बसतात त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ? |

| | |
|---|---|
| **विरोधी पक्ष नेता** | सभागृहाची शिस्त काम असते यांना माहीत नाही काय ? माझी विनंती आहे की ,सदरच्या प्रकरणात आयुक्त साहेबांचा खुलासा करण्यात यावा, त्यानंतर मी खाली बसतो. |
| **महापौर** | श्री बालासाहेब आपणास वारंवार सुचना दिलेल्या आहेत .आपण शांत रहावे आणि खाली बसावे. |
| **श्री बालासाहेब देशमुख** | आम्हाला वांरवार सुचना देता खाली बसण्यास सांगता त्यांना का सांगत नाही. |
| **महापौर** | प्रभारी आयुक्तांकडे या प्रकरणात एक हेरींग झालेली आहे .आयुक्त साहेब दोन दिवस मनपाकेत रुजू झालेले आहेत यात जी काही अनियमतता झालेली असेल यात एक महीण्याचे आंत चौकशी करुन जे कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कार्यवाही तात्काळ कार्यवाही करतील. |
| **विरोधी पक्ष नेता** | एका महीण्यात कार्यवाही करतील असे मिनीटमध्ये आयुक्तांचे म्हणने येवू दयावे .प्रशासनाची बाजू आयुक्त साहेबांनी सांगावे .त्यांना बोलू दयावे. |
| **बालासाहेब देशमुख** | मा.आयुक्त हे पीठासन अधिकारी आहेत .त्यांना बोलू दयावे. |
| **विनय गुर्रम** | सदरचा विषय हा प्रशासनाचा आहे .त्यामुळे त्यांचे मत यात येणे आवश्यक आहे .यात आयुक्तांचा खुलासा झाला पाहीजे. |
| **बालासाहेब देशमुख** | यात आयुक्तांचा खुलासा झाला पाहीजे. |
| **विरोधी पक्ष नेता** | यात आयुक्तांचा खुलासा झाला पाहीजे. |
| **महापौर** | मा .आयुक्त साहेबांनी या प्रकरणात दोन वेळा खुलासा केला आहे. |
| **अंजली गायकवाड** | सभागृहात बालवाडीचे मुले आहेत काय त्यांना एवढे सांगावे लागत आहे .त्यांना कळत नाही काय वारंवार त्यांना सांगावे लागत आहे. |
| **अब्दुल सत्तार** | बजेटची मिटींग चालू करण्यात यावी. |
| **विरोधी पक्ष नेता** | जे आम्हाला बालवाडीचे समजत आहेत, ते भ्रष्टचारा सोबत आहेत असा आमचा आरोप आहे .मी काल एक पत्र आपणाकडे दिले आहेत .ते पत्र आपलयाकडे आले आहे काय ? |
| **बालासाहेब देशमुख** | सौ. गायकवाड मॅडम यांनी जे बोलले आहे त्यांनी ते शब्द मागे घेण्यास सांगावे .मा .महापौर मॅडम ,मनपाचे सभागृह आहे .आम्हाला तुम्ही बालवाडीचे का म्हणता असे म्हणता कामा नये .या ठिकाणी आम्ही 6लाख जनतेचे प्रश्न मांडत आहोत. |
| **विरोधी पक्ष नेता** | आम्हाला तुम्ही बालवाडीचे का म्हणता असे म्हणता कामा नये .या ठिकाणी आम्ही 6लाख जनतेचे प्रश्न मांडत असतो. |
| **करुणा जमदाडे** | मनपाचे 2महीण्यापूर्वी एक दैनंदिनी प्रकाशीत केली आहे .या दैनंदिनीमध्ये राष्ट्रीय पुरुषाचे जयंती पुण्यतीथी साजरी करण्यात यावे .ही दैनंदिनी प्रकाशीत करण्यात आली .त्यावेळी माझ्या मनामध्ये एक प्रश्न निर्माण झाला ,जगभर तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती साजरी करण्यात येते.पण या दैनंदिनीत याचा उल्लेख करण्यात आलेला नाही .या दैनंदिनीची प्रत आपल्या हाताने प्रकाशीत करण्यात आलेली आहे .पुण्यश्लोक अहील्याबाई होळकर, कै.सावित्रीमाई ,कै.इंदिरा गांधी यांच्या नांवाचा उल्लेख झालेला आहे परंतू यामध्ये ज्या रमाई मातेने भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली .एवढा मोठा राष्ट्रीय नेता केवळ आपणास रमाईने त्यांना साथ दिल्यामुळे मिळाला आहे .त्या रमाईच्या जयंतीचा देखील यात उल्लेख असल्याचे दिसुन येत नाही .जानिवपुर्वक रित्या दोन्ही जयंती या घेण्यात आलेल्या नाहीत .या दैनदिनचे पाने बदलूनया दोन्ही नांवाचा समावेश करण्यात यावा व डायरी पुन्हा प्रकाशीत करण्यात यावी. |
| **महापौर** | या दैनदिनीत दुरुस्ती करुन तथागत भगवान गौतम बुध्द व रमाई यांच्या नांवाचा समावेश करुन दैनदिनी पुन्हा प्रकाशित करण्यात यावी. |
| **स. शेर अली** | दलीत वस्तीचे 10कोटी रुपये परत गेले आहेत त्याचे काय याबाबत खुलासा करावा. |
| **सभागृह नेता** | त्यांनी आताच सांगीतले की ,हे विमोचन मा .महापौर यांचे हस्ते झालेले आहे .त्याच वेळी महापौरांनी सांगीतले होते की ,यात काही दुरुस्ती असतील तर करावे. |
| **आनंद चव्हाण** | ज्या अधिका-यांने ही डायरी छपाई केली आहे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी .पाच मिनीटात चौकशी करुन संबधीतावर कार्यवाही करावी. |
| **बालासाहेब देशमुख** | तथागत भगवान गौतम बुध्दाचा विषय हा गंभीर विषय आहे .त्या अधिका-यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. |
| **विनय गिरडे** | 5मिनीटात कार्यवाही करावी. |
| **करुना जमदाडे** | याची जबाबदारी कोणावर होती त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. |
| **बालासाहेब देशमुख** | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शतकोत्तर 125वर्ष महोत्सव साजरा करण्यात आला आहे . एवढी मोठी चुक जर मनपाच्या अधिका-यांने केली असेल तर त्या अधिका-यावर निश्चीत कार्यवाही झाली पाहीजे. |
| **महापौर** | भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा विषय नाही .तथागत भगवान गौतम बुध्द यांचे जयंतीचा विषय आहे त्यामुळे बाळासाहेबांनी विषयला धरुन बोलावे. |
| **बालासाहेब देशमुख** | सदरची डायरी ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर जयंतीमुळे प्रकाशित करण्यात आलेली आहे .इतर महा मानवाचे जयंतीचा उल्लेख आहे तर तथागतांच्या जयंतीचा उल्लेख का नाही ? |
| **स.सरजितसिंह गिल** | सदर डायरी प्रकाशीत झाल्यानंतर संबधीत नगरसेवकांना लेखी मध्ये आक्षेप घेतला काय ? घेतला असेल तर खुप चांगली गोष्ठ आहे .तात्काळ कार्यवाही करण्याचे आपण आश्वासन दिलेले आहे . त्यामुळे दुसरे विषय घेण्यात यावे. |
| **अंजली गायकवाड** | आता ज्या विषयावर चर्चा करण्यात आलेली आहे त्या विषयानुसार तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी .दोन दिवसापुर्वी मा .आयुक्त साहेब रुजू झालेले आहेत त्यांनी पेपरला बातमी दिली की ,मला नांदेडची ओळख ही कागदोपत्री झालेली आहे .ही आमच्यासाठी कौतुकाची बाब आहे .त्यांना नांदेड विषयीची ब-यापैकी माहीती आहे .त्यामुळे या नांदेड शहरास स्वच्छ नांदेड सुंदर नांदेड ही संकल्पना आपणास रुजविता आले तर आपले फार मोठे योगदान या शहराला मिळाले तर आपण चांगली |

जीमेदारी पार पाडली असे होईल .मा .महापौर मॅडमला विचारावयाचे आहे की ,दलीत वस्तीचा 10 कोटीचा निधी परत गेलेला आहे .तुम्ही लेटर न दिल्यामुळे तो निधी परत गेला आहे .या विषयाची माहीती सर्व सभागृहास ऐकरण्याची इच्छा आहे .ज्या ठिकाणी दलीत वस्ती आहे त्या ठिकाणी आपण दौरा करावा .तो निधी का परत गेला ,जे बजेट स्थायी समिती सभापती मा .सौ अनुजा तेहरा मॅडम यांनी सादर केले ते बजेट केव्हा कसे लागु होईल त्याची पुर्तता आपण कधी करणार याचा खुलासा करावा.

**महापौर** ते त्यांचे सभागृह आहे .त्याबाबत ते स्वत :खुलसा करतील ते सभागृह वेगळे आहे.

**अंजली गायकवाड** दलितवस्तीचा निधी वापस गेलेला आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

**महापौर** दलीत वस्तीचा निधी का परत गेला हा आपला पहिला प्रश्न आहे .मनपाने वेळेवर लीस्ट तयार केलेली आहे .ती लिस्ट वेळेवर मा .जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविलेली आहे यात मनपाची काही चुक नाही .जी काही दिरंगाई आहे ती संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयाची आहे मनपाची चुक नाही .दुसरा प्रश्न आहे की ,नांदेड हे स्वच्छ राहीले पाहीजे .यासाठी मा .आयुक्त साहेब हे स्वच्छ महाराष्ट्र मिशनचे डायरेक्टर राहीलेले आहेत .त्यामुळे ते नांदेड स्वच्छ व सुंदर नांदेड करण्यासाठी प्रयत्न करतील यात शंका नाही.

**अंजली गायकवाड** रु 10.कोटीचा निधी परत गेला आहे त्याचा खुलासा करावा.

**महापौर** रु 10.कोटीचा निधी परत गेला आहे तो विषय आपलयाशी संबंधीत नाही तो जिल्हाधिकारी कार्यालय व मा.पालकमंत्री यांच्याशी संबधीत आहे.

**बाळासाहेब देशमुख** दलीत वस्तीचा ठराव देण्यासाठीमा.महापौर मॅडम यांनी विलंब लावला आहे असे ऐकण्यात आले आहे.

**अशोक उमरेकर** हा निधी वापस गेला त्याचे मुख्य कारणे काय आहेत .आपण 2-2कोटी 5-5,कोटीचा निधी मागण्यासाठी पाठपुरावा करतो आणि 10कोटीचा निधी वापस गेला.

**बाळासाहेब देशमुख** आपण दलीत विरोधी आहात काय ?

**विनय गुर्रम** मा .पालकमंत्र्याचे आपण नांव घेवू नका.

**अशोक उमरेकर** ज्या ठिकाणी दलीत बांधव नाहीत त्या ठिकाणी तुम्ही निधी खर्च केला आहे .केवळ हे हेवेदाव्यामुळे निधी खर्च झालेला नाही .मा.पालकमंत्र्याचा यात संबध नाही आपण मा .पालक मंत्र्याचे नांव घेवू नये .आपल्यामुळे हा निधी परत गेलेला आहे .

**बाळासाहेब देशमुख** दलीत वस्तीचा निधी वापस कसा जातो याचा खुलासा करावा.

**अशोक उमरेकर** 5 -5कोटीसाठी आपण मागणी करीत असतो ,आणि 10कोटीचा निधी परत पाठता हे योग्य आहे काय ? तुम्ही दुस-यावर आपण आरोप ठेवू नका.ती चुक तुमची आहे ,तुम्ही सिध्द करुन दाखवा.

**बाळासाहेब देशमुख** ही तुमची जिम्मेदारी होती ,त्यांची नव्हती.

**अंजली गायकवाड** आपण म्हणता ही चुक मा.पालकमंत्री व जिल्हाधिकारी कार्यालयाची आहे तर आपला यात काहीच संबध नाही काय ? याचा खुलासा करावा.

**महापौर** आपण लिस्ट फक्त जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवतो याची कल्पना आपणास असावी.

**बाळासाहेब देशमुख** यादी पाठविण्यास विलंब झाला की नाही एवढे उत्तरे दयावे .दलित वस्तीचा निधी म्हणजे आपणास खेळ वाटायला काय ? सगळा झोपड पटी एरीया आहे नांदेडमध्ये त्या ठिकाणचा इन्फ्राचा निधी गेला आहे.

**अशोक उमरेकर** इतरांची तुम्ही चौकशी करता .तुम्ही तुमची चौकशी करत नाही .इथे दलीत समाज राहतो म्हणुन त्या ठिकाणी आपण 5कोटीचा निधी लावता माझ्या प्रभागामध्ये 80टक्के दलीत वस्ती असतांना तुम्ही निधी देत नाहीत.

**शेख बावजीर** अल्पसंख्याकाचा निधीदेखील दिलेला नाही.

**अशोक उमरेकर** 10-10कोटीचा निधी परत जात आहे .आपण दोन-दोन कोटीच्या निधी करीता परेशान असतो . यांना त्याचे काही देणे घेने नाही.

**बाळासाहेब देशमुख** आपण दलित विरोधी आहात काय हे सांगावे .जर दलित विरोधी नाही तर मग निधी वापस कसा गेला.

**अशोक उमरेकर** आपण जिल्हाधिका-याकडे व मा.पालकमंत्र्याकडे आपण बोट दाखवता आणि आपली बाजू झटकुन टाकता .तुम्ही आपले गुनधर्म सांगितले पाहीजे .तुमच्यामध्ये काय गुनधर्म आहेत ते दाखवत नाही.

**बालासाहेब देशमुख** ज्या ठिकाणी दलीतवस्ती नाही त्या ठिकाणी कामे आपण करता .निधी परत न जावू देण्यासाठी आपले कर्तव्य होते.

**विनय गुर्रम** निधी परत न जावू देण्यासाठी आपले कर्तव्य होते.

**अशोक उमरेकर** दलीत वस्तीचा जो निधी रु 3 .ते 3.50खर्च झाला तो निधी देखील मोजक्याच 2ते 3वार्डाच्या नगरसेवकाच्या वार्डात खर्च केला आहे .ज्या ठिकाणी डॉक्टर लोक राहतात त्या जागी निधी खर्च केला गेला .केवळ आपण फायदा पाहता .गरीब लोकांचे नांवाचा उपयोग घेता विकासाची कामे इतर ठिकाणी करता .तयांच्या नांवाने निधी आनता कामे मात्र इतर ठिकाणी करता.

**शेख बावजीर** अल्पसंख्याकासाठी आलेला निधी त्वरीत खर्च करण्यात यावा.

**बाळासाहेब देशमुख** आपण दलीत विरोधी व अल्पसंख्याक विरोधी आहात काय हे सांगावे.

**अब्दुल सत्तार** सर्व साधारण सभेने इराव करुन दिलेला आहे .पण कलेक्टर ऑफीसच्या प्रशासनामार्फत लेट झालेले आहे .माझी विनंती आहे की ,ज्यांची सत्ता आहे त्यांनी सहकार्य करावे.

**बालासाहेब देशमुख** मनपात तुमची सत्ता आहे त्याचा विचार करा.

**विरोधी पक्षनेता** शासनाने तुम्हाला पैसे दिले आणि तो निधी खर्च न करता वापस पाठविला.

**अशोक उमरेकर** तुमच्या हेवेदाव्यामुळे पैसे परत गेले आहेत.

**अब्दुल सत्तार** सत्ताधारी तुम्ही आहात आम्ही नाही.

**अशोक उमरेकर** मनपा तर तुमची सता आहे ना .शासनात आमची सत्ता आहे.

विनय गुर्रम — आमच्या शासनाने रु 10.50 .कोटीचा निधी दिला होता पण तो निधी आपणास वापरता आला नाही.

अब्दुल सत्तार — मा.महापौर यांना विचारु नका मा .जिल्हाधिकारी यांना प्रश्न विचारा.

बाळासाहेब देशमुख — हे केवळ दिशाभुल करीत आहेत.

अशोक उमरेकर — रुपये एक-एक कोटी रुपये लावता.समाज करण्याण अधिका-याकडून आपण चौकशी केली काय . मा.पालकमंत्री साहेबांनी ,मा.जिल्हाधिकारी व मा.आयुक्त ,समास कल्याण अधिकारी यांना सुचना दिल्या की ,ज्या ठिकाणी दलीतवस्ती नाही त्या ठिकाणचे कामे वगळण्यात यावे .अशा सुचना दिल्या आहेत.

विनय गिरडे — मा.महापौर मॅडम ,या दोन-तिन नगरसेवकांना घेवून आपण सर्वसाधारण चालवावी. आम्ही तो पर्यत बाहेर थांबतो .त्याचे पुर्ण बोलणे झाल्यानंतर आम्हाला बोलवावे .त्यानंतर आम्ही आमचे प्रश्न मांडतो.

उमेश चव्हाण — त्यांचे म्हणने ऐकुन घ्यावे .त्याचेनंतर आम्ही बोलतो.

अशोक उमरेकर — दुस-याच्या अधिकारावर गदा आणणार आहात काय ?

विनय गिरडे — सेना-बीजेपीला घेवून सर्वसाधारण सभा चालवा .चला आपण बाहेर जावू.

महापौर — आपण आप-आपसात बोलू नये .जे काही प्रश्न आहेत ते मला विचारावे.

विनय गिरडे — मा.महापौर मॅडम ,आम्ही आपणास एक तासाचा वेळ देतो .यांचे जे काय प्रश्न आहेत तया सर्व प्रश्न एकदा विचारुन घ्या .त्यांना त्याचे उत्तर दयावे .यांच्याकडून सर्वसाधारण सभा ठरवा आणि त्यानंतर आम्ही सभागृहात येतो.

अशोक उमरेकर — तुम्ही तर मजेमध्ये आहात ना .आमच्या नशिबाला आले आहे.ते तुम्ही हीरवून घेत आहात.असे किती खानार आता .पुरे झाले की?

विनय गिरडे — वैयक्तीक बोलू नये .वैयक्तीक बोलण्याचा कोणासही अधिकार नाही यांचा असाच तमाशा चालू राहीला तर आम्ही सभागृहात येणे बंद करु.

अशोक उमरेकर — मी आपणास बोललो नाही .मी कोणाचेही नांव घेतले नाही.

विनय गिरडे — हे प्रत्येक सभेमध्ये वारंवार वैयक्तीक बोलतात .काहीही प्रश्न मांडतात ते विकासाचा मुददा नाही. सभागृहात निट बोलायचे .मा .महापौर मॅडम यांनी मागील दोन महीण्यापासूनची मनपाची सर्वसाधारण व बजेटची सभा आयोजीत केली आहे .त्यांचे मत न मांडता केवळ सभागृहात तमाशा करुन पेपरमध्ये फोटो आला पाहीजे एवढेच काम आहे .त्यांना शहराच्या विकासासाठी काही देणे घेणे नाही .त्यामुळे जे धिगांना करतात .त्यांना प्रथम निलबिंत करावे आणि सभागृह चालू ठेवावे.

बालासाहेब देशमुख — सर्व नांदेड शहर हा धिगांना पाहत आहे .सगळे नांदेड शहराला दाखविण्यात येत आहे.आम्ही खाली आहोत तुम्ही वर आहात तुम्ही तरी आम्हाला न्याय दयावा.

अंजली गायकवाड — सर्व माझ्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

विरोधी पक्ष नेता — नांदेड वाघाळा मनपा सहाय्यक आयुक्त यांचा प्रस्ताव आपल्याकडे आला आहे का ? त्या मनपाचे सहाय्यक आयुक्त यांचा प्रस्ताव शासनाकडे (4) 45नुसार पाठविला आहे .त्यास शासनाचा आपणाकडे आला काय ? हे पत्र मी तुमच्याकडे दिले आहे ते तुमच्या कडे आले आहे हे नगरसचिव यांनी सांगावे.

बाळासाहेब देशमुख — दलीतवस्तीचा निधी वापस चालला याची चौकशी लावली काय ? रमाई आवास योजनेचे 18कोटी रुपयाचा निधी येवू पडला त्याचे मागील एक महीण्यापासुन एक रुपयादेखील खर्च झालेला नाही.

शेख बावजीर — दलीत वस्तीचा व मायनॉरीटीचा निधी वापस जात आहे त्याचा आपणास खुलासा करावा लागले . मायनॉरीटीचा 20लक्षाचा निधी वापस गेला आहे .त्यास कोण जबाबदार आहे ? याचा खुलासा करावा.

अंजली गायकवाड — आम्ही तुम्हाला प्रश्न विचारावा की नाही,हे सांगा.

फारुख अली खाँ — मा.महापौर मॅडम ,या सभागृहामध्ये केवळ 4ते 5लोक बोलून ते गोंधळ घालत आहेत .आणि पुर्ण सभागृहाचा अपमान करीत आहेत .कोण काय बोलत आहे हे काही कळायला काहीच मार्ग नाही.

विनय गुर्रम — सभागृहाचा अपमान कोण केले ?

विनय गिरडे — पुर्ण विषय पत्रीका पास ...अशी आपणास विनंती आहे.

विरोधी पक्ष नेता — मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छीतो की ,मनपा आवक-जावक क्रमांक 6713चे पत्र सहाय्यक आयुक्त यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव आपणाकडे कधी आला आहे.याची माहीती नगरसचिव यांनी दयावी . सभागृहास विनंती आहे की ,हा प्रश्न समजून घ्यावा .मी काल पत्र तुम्हाला दिले आहे .शासनाकडे काल 21जूनला अनुसूचित जाती -जमाती कल्यान समितीची एक बैठक मुंबईला झाली .या समितीला हा अहवाल सादर केला आहे. त्या अहवालात नमुद आहे की ,सहाय्यक आयुक्तांचा पदोन्नतीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आले आहे .विधी मंडळाची प्रत माझ्याकडे आहे.हा कीती गंभीर आरोप आहे .सभागृहावर हा आरोप नगरसेवकावर आहे .मा .महापौर साहेबांना आपल्यावर सुध्दा आरोप आहे .हा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे म्हणून .हा प्रस्ताव आला किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा .जी विधी मंडळाची उच्च समिती आहे त्या समितीस हा अहवाल सादर केला आहे .हे कोणी अहवाल सादर केला आहे .आमच्याकडे प्रस्तावच आलेला नाही . शासनाला चुकीची माहिती देण्यात आली आहे याचा खुलासा करण्यात यावा .

महापौर — सहाय्यक आयुक्तांच्या पदोन्नती बाबतचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला नाही.

विरोधी पक्ष नेता — प्रशासनाने हा प्रस्ताव विधी मंडळाला का दिला आहे .मी जर खोटे बोलत असेल तर पेपर तर खोटे बोलणार नाहीत .कागद तर खोटे बोलणार नाहीत ना ? याच संदर्भात दिनांक 21जुनच्या तारखेला सुध्दा खोटे बोलले गेले आहे.तुम्ही शासनाला अंधारात ठेवले आहे आणि आपणास तर अंधारात ठेवलेच आहे आणि शासनालाही अंधारात ठेवले आहे .याचा जिमेदार कोण आहे याचा खुलासा करण्यात यावा .

| | |
|---|---|
| **रामनारायण काबरा** | हा गंभीर विषय आहे .या गंभीर विषयावर चर्चा करुन निर्णय घेतला पाहिजे .अस जर हे होत असेल तर हे चुकीचे आहे आणि अस होण आपणास शोभा देत नाही. |
| **महापौर** | आमच्याकडे प्रस्ताव आलेला नाही. |
| **विरोधी पक्ष नेता** | मग हे विधी मंडळाकडे गेले कसे याचा आधी खुलासा करावा .तुमच्याकडे विषय आला नसेल तर सभागृहात पेन्डींग विषय आहे. |
| **आनंद चव्हाण** | हातखडी लावण्यात यावी. |
| **सभागृह नेता** | विरोधी पक्ष नेता हे आम्हास मान्य आहे पुढे बोला. |
| **विरोधी पक्षनेता** | प्रशासनाने आपणास अंधारात ठेवलेच पण त्या सभागृहास देखील अंधारात ठेवले आहे .याला जिमेदार कोण आहे . |
| **अब्दुल सत्तार** | याबाबत काय करावयाचे आहे हे प्रथम सांगावे. |
| **नगरसचिव** | मा.महापौर महोदया ,मा.विरोधी पक्ष नेता यांनी जी काही तक्रार केली आहे .तो दिनांक 25.8.2015 रोजीचा प्रस्ताव आहे तो नगर सचिव विभागास अप्राप्त आहे प्रशासनाने प्रस्ताव पाठविलेला असेल पण या विभागास प्राप्त नाही . |
| **विरोधी पक्षनेता** | पत्रकारांना माझी विनंती आहे की ,याची नोंद घ्यावी .प्रस्ताव मनपाकडे आलेलाच नाही. |
| **आनंद चव्हाण** | पत्रकाराचा काय संबंध हे सांगा. |
| **विरोधी पक्ष नेता** | मनपाकेत काय चालू हे तर त्यांना कळू दया . |
| **उमेश चव्हान** | प्रस्ताव पाठविणारे कोण आहेत ,याची माहीती देण्यात यावी . |
| **महापौर** | आमच्याकडे प्रस्ताव आलेला नाही .संबंधीत त्या विभागात जे कोणी असतील ते या गोष्ठीचा खुलासा करतील. |
| **विरोधी पक्षनेता** | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. नगरपालिका सचिवाच्या नेमणुकी व्यकतिरिक्त या कलमान्वय केलेल्या प्रत्येक नेमणुक (राज्य) शासनाकडून कायम करण्याच्या अधिन असेल आणि ज्या कोणत्याही अधिका-यांची नेमणुक कायम करण्याचे राज्य शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरुन काढून टाकण्यात येईल. परंतु अशी कोणतीही नेमणुक ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासुन सहा महिण्याहुन अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा तो अशा तारखेपासुन सहा महिने झाल्यानंतर करता येणार नाही. सदरील नियमातील तरतुदीनुसार सहाय्यक आयुक्तांसाठी अधिनियमातील कलम ४५(४) नुसार शासन मान्यता आवश्क आहे परंतु यापैकी तीन सहाय्यक आयुक्तांचा शैक्षणिक अर्हता शिथील करण्या बाबत मनपा सर्वसाधारण सभेने ठराव सुध्दा पारीत केलेला नाही. अशी तरतुद असतांना तुम्ही त्यांना पगार देतात त्यामुळे मनपाकेचा आर्थीक नुकसान होत आहे संबंधीतास तात्काळ पदावनत करण्यात यावे या बाबत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. |
| **विरोधी पक्षनेता** | मागे 2012मध्ये 2लोकांचे पदोन्नतीसाठी नांवे देण्यात आली इतर लोकांचे का नांव देण्यात आले नाही. |
| **महापौर** | त्यावेळी जे कोणी आस्थापनेला असतील त्यांची छाननी करुन चौकशी आयुक्तांनी करावी .त्याचा अहवाल 15दिवसात आयुक्तांनी सादर करावा जर यात काही अनियमीतता आढळली असेल तर त्यात कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर आयुक्तांने तात्काळ कार्यवाही करावी. |
| **विरोधी पक्ष नेता** | आयुक्तांना एकदा खुलासा करु दयावा.आयुक्त साहेब काय कार्यवाही करणार आहेत याचा खुलासा करु दया. |
| **उमेश चव्हाण** | मा.महापौराची रुलींग झालेली आहे की सभेसमोर प्रस्ताव आलेला नाही. |
| **महापौर** | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(४) मधील तरतुदीनुसार जर सहाय्यक आयुक्त या पदाची शासना मार्फत 15 दिवसांचे आत मान्यता मीळाली नाही तर त्या सर्व सहाय्यक आयुक्तांना पूर्व पदावर (पदवनत) करण्यात यावी. |
| **विरोधी पक्षनेता** | संबंधीतानी 6महीण्याचे आंत पदोन्नतीचा प्रस्ताव शासनाकडून घेवून आला पाहिजे होते .परंतू आज पाच ते सहा वर्ष झाले आहेत .त्याच पदावर बसुन पद उपभोगत आहेत. सगळया काही मनपाच्या सुविधा ते घेत आहेत .ही पध्दत आहे .शासनाला अंधारात ठेवले आहे .सभागृहाकडे प्रस्ताव पेन्डींग आहे हे सभागृहाला बदनाम करण्याचे काम आहे .यात तुम्ही गुंतून आहात काय ? पदोन्नतीचा प्रस्ताव त्यांनी घेवून आले पाहीजे होते .पण पाच ते सहा वर्ष झाले .तेव्हा पासून त्या वेतनश्रेणीत पगार उचलतात त्यामुळे मनपाकेचा आर्थीक नुकसान होत आहे. मनपाचा भत्ता, गाडी घेत आहेत ,कॅबीन घेत आहेत. सगळया सुविधा घेत आहेत .ही कोणती पध्दत झाली .मा .आयुक्त साहेब याच्यावर खुलासा करण्यात यावा. मा .महापौराची रुलींग आलेली आहे ,तुम्ही आता सांगा. |
| **आयुक्त** | मा .महापौर महोदया ,प्रशासनावर बरेसे प्रश्न आता आज चर्चेले जात आहेत बहुतेक प्रशासनाला यापुर्वी वेळ मिळाला नसेल काही हरकत नाही .प्रशासनातले जे काही पदोन्नतीचे विषय आहेत .जी काही अनियमीतता झाल्या बददल एक विषय आपल्याकडे दिलेला आहे की ,कृती आराखडा आरआर ,आकृतीबंधाचा विषय हा संख्याचा विषय आहे .रीक्रुटमेन्ट रुल्सचा विषय आहे मी मंत्रालयात 5ते 6वर्ष कामकरीत असतांना सालसन 2008ची समिती नेमली होती त्या समितीचा मी सदस्य होतो .त्यावेळी विविध मनपाच्या संदर्भाने या समितीच्या मार्फत मनपाचे रिक्रुटमेंन्ट रुल्स बनविले होते .त्यातला मुख्य उदेश आहे की ,संस्था ज्या असतात त्या विश्वासावरती आणि सन्मानावरती चालत असतात .यात असणारे पदाधिकारी ,सदस्य ,अधिकारी व कर्मचारी असतील ते सार्वजनिक जिवनामध्ये वेगवेगळे काम करणारे सभासद असतील .संस्था या ज्या विश्वासावरती चालणे अपेक्षीत आहे आणि हा विश्वास ढळमळीत न होता जे आवश्यक गोष्ठी आहेत करणे गरजेच्या असतात .त्या करणे गरजेचे असतात.सार्वजनिक जिवनामध्येमानुस काम करीत असतांना चुकीचे काम करतो अशा प्रकारचा समज प्रत्येक्ष असता कामा नये. अश प्रकारचे विषय चर्चीले जात असतात.सर्व साधारणपणे रिक्रुटमेन्ट रुल्स बनवण्याचीजी प्रक्रीया चाललेली आहे त्या शासनाकडून |

तो विषय आपल्याकडे आलेला आहे .त्या अनुषंगाने एकदा का विषय मार्गी लागला तर एक-दोन विषय आहेत .ते बहुंताशी निकाली निघू शकतील .असा मला विश्वास वाटतो .नंबर दोन माझ्यासमोर चर्चेतून माझ्यासमोर विषय आले आहेत काही अधिकारी कर्मचारी यांनी काही चुकीच्या पदोन्नत्या घेतल्या आहेत असा एक समज दिसत आहे .मी शक्यतो मानसावरती विश्वास ठेवतो . व्यक्ती वाईट नाहीत .कधी कधी परिस्थितीमुळे जर काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करता येतात .चुक झाली म्हणजे फासावरच लटका ? अशा प्रकारची भुमीका राहील .चुका झाल्या असतील तर निश्चीतपणे दुरुस्त कराव्यात .हेतूपरसर झाले असेल तर गय गेली जाणार नाही .मग ती मढे उखरावयाचे असतील किंवा मानसे उखरावयाचे असतील 6 .लाख नांदेडकर जनतेच्या हीताचे कोणतेही वाईट काम होवू देणार नाही याची ग्वाही देतो .माझी आयुक्त पदाची ही तिसरी टर्म आहे . प्रयत्न असा असणार आहे की ,खर्चीत बसुल पैसे खायला अक्कल लागत नाही .नांदेड शहराचे फार जुने संबध आहेत .सभागृहात बोलायचे नसते पण सांगीतले पाहीजे .मी येणार आहे तयावेळी चर्चा होत्या .माझे वडील 1956साली नांदेड जिल्हयामध्ये मुख्याध्यापकाच्या नौकरीत होते.जेंव्हा आमच्या घरी कळले की ,माझी या ठिकाणी बदली झाली .आता माझे वडीलाचे वय 85वर्ष आहे.त्यामुळे नांदेड जिल्हयाचा फार जुना संबंध आहे .नांदेड शहरात आलेलो आहे .आणि मी जेंव्हा केंव्हा हे नांदेड शहर सोडेल तेंव्हा कोठे तरी चांगल काम करुन देवू शकलो अशी माझी भावना राहील .सन 2008मध्ये जेएनएनयुआरएमचे कामा निमीत्ताने काही सहभाग देता आला .काही खारीचा वाटा नांदेडकरांसाठी होता.मी तुम्हाला आश्वस्त करु इच्छीतो की,कामे होतील ती कामे नियमाने असणार आहेत .कायदयाने होणार आहेत .ज्यामध्ये नांदेडकरांची जी विकास कामे आहेत .त्या कामासाठी आपण जमलेलो आहोत यातुनच आपण विकास करणार आहोत .जर चुका झाल्या असतील तर संधी देवू जर वारंवार हेतुपुरस्सर झाले असेल तर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे मी तुम्हाला आश्वस्त करु इच्छीतो आणि नांदेडसाठी आपण सर्व मिळून निटपणे चालगले काम करु.आपण जे स्पेसीफिक मुददयावर चर्चा झाली ,मा .महापौर मॅडम ,यांनी पदोन्नतीच्या बाबतीत ज्या त्रुटी झाल्या आहेत त्याची देखील पहानी करतो .त्यात जे कोणी दोषी आढळले त्यांच्यावर निश्चीत कार्यवाही करतो.

**विरोधीपक्षनेता** मा .आयुक्त साहेब ,मनपाकेत फार मोठा अनागोंदी कारभार झाला आहे .मी आपल्या कॅबीनमध्ये येवून सविस्तर माहिती दिले .यावर लक्ष देवून कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे .

**शेख बावजीर** ईदच्या संदर्भात माझा प्रश्न आहे तो ऐकुन घ्यावा.

**स. शेर अली** रमजान ईदच्या संदर्भातील पाणी सोडण्याचा प्रश्न आहे तो ऐकुन घ्यावा.

**शेख बावजीर** रमजान ईद निमित सतत तीन दिवस पाणी सोडण्यात यावे.

**सभागृह नेता** दिपावळी सण असो ,ईद असो ,आपण दरवर्षी सतत तिन दिवस पाणी नागरीकांना पाणी देतो.

**महापौर** प्रतीवर्षी आपण दिपावळीला व इतर सणाला जसे पाणी सोडतो याच पध्दतीने यावर्षीही रमजान इदला तीन दिवस सतत पाणी सोडण्यात यावे.

**सय्यद जानी** आपण आता तीन दिवस पाणी ईद निमीत्त देण्याचा विषय सांगीतले आहे .पण इंजीनिअर म्हणतात की ,ज्या ज्या ठिकाणी पाण्याची सुविधा नाही .त्या ठिकाणच्या बोरमध्ये गाळ जावून बसला आहे .आजपर्यत कोणत्याही टाक्या पाण्याने भरलेल्या नाहीत .आता तुम्ही 8ते 10दिवस पाणी सोडत आहात ते पाणी येत नाहीत.सकाळची वेळ 10वाजता असेल तर सांयकाळी 4.00 वाजता पाणी येत आहे.दुपारची वेळ असेल तर रात्री 12.00वाजता पाणी येते .हीच सुविधा बरोबर नाही तर आपण ती दिवस कसे पाणी सोडणार .सतत पाणी देता असे आपण आश्वासन देतो . आपण आपल्या अभियंत्यास आता बोलवा की ,तो या काळास अंतमीम स्वरुप देवू शकतो .त्याचे म्हणने ऐकुन घ्यावे .आम्ही एक-एक ,दोन-दोन महीण्यायचे आश्वासन ऐकणार नाही .संबधीत अभियंत्याने समोर उभे राहुन तोंडी आश्वासन दयावे.त्यावी पुरेपुर अमंलबजावणी कराव .तीन तीन महीण्यापासून याचा काय विषय चालू आहे .केवळ पाण्याच्या विषयावरच चालू आहे .मा . जिल्हाधिकारी यांचा निषेध केला गेला आहे .कलेक्टर साहेबांनी विरोधी पेक्ष नेत्यास आश्वासन दिले होते की ,जुन्या शहरात पाणी पुरवठा करतो .नांदेड शहराचे नविन शहरात दोन तिन टॅंकर आहेत . आपण एक ट्रक पाठविला होता आणि दुस-या दिवसी तो मेक्यानिकच्या लाईनला गेला आहे . महापौर साहेबांने टॅंकर पाठविल्यानंतर तो टॅंकर मेक्यानिकच्या लाईनला गेला .तर एवढया मोठया नांदेड शहराला रमजानच्या महीण्यात तीन दिवस पाणी कसे देणार हे सांगावे याचा आम्हाला खुलासा करावा .तसेच एक परिपत्रक काढून जन्म प्रमाणपत्र व मृत्यु प्रमाणपत्र देवू नये यामुळे लोंकाचे फार मोठे नुकसान होत आहे .त्यासाठी जो ठराव केला आहे तो ठराव आजच्या आज रदद करण्यात यावा .ठराव जर नसेल तर आदेश आजच रदद बातल करण्यात यावा .त्या लोकांना प्रमाणपत्र देण्यात यावे .ज्यांना प्रमाणपत्राची गरज आहे.

**बाळासाहेब देशमुख** माझ्या वार्डाचा पुरेपुर फायदा करण्यासाठी मला अधिकार आहे .त्या अधिकारानुसार मला बोलू दयावे.

**महापौर** अधिकाराचा आपण पुरेपुर फायदा घेतला आहे ,आपण खाली बसा.

**स .जानी** माझ्या प्रश्नाचे आतापर्यत आले नाही त्याचे उत्तर देण्यात यावे.

**श्रध्दा चव्हान** ब-याच वेळापासुन आपण बोलत आहात आम्हाला बोलू दयावे.

**बाळासाहेब देशमुख** आम्हाला का बोलता .ते आपण महापौर यांना सांगा .आम्हाला सांगू नका.

**श्रध्दा चव्हान** माझ्या प्रभागामध्ये क्रास कनेक्शनचा विषय मागील एका वर्षापासून आहे .ते क्रास कनेक्शनचा विषय काही सोडविण्यात आलेला नाही .एका वर्षापासुन अधिका-याच्या मागे लागून आहे .हा प्रश्न तुमच्यासमोर येवून सांगण्यात आला होता.तरही तो प्रश्न सुटला नाही .याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

**माहिनी कनकदंडे** मा.महापौर मॅडम ,मनपाला एवढे अनुभवी आयुक्त साहेब मिळाले आहेत .त्याचे प्रथम मी अभिनंदन करतो .मा.महापौर यांनी आता तीन दिवस आड पाणी देण्यात येणार आहे .त्याबाबत त्यांचे अभिनंदन करतो हे पाणी सोडण्यामध्ये सुसुत्रता पाहीजे ,नियोजन पाहीजे .पाणी जेंव्हा सोडले जाते तेंव्हा काही तरी प्राब्लेम्स असतात .अभियंते आम्हाला काही प्राब्लेम्स सांगतात .हा प्रश्न सगळया सदस्यांना भेडसावतो .कोठे तरी पाणी सोडसयाचे वेळापत्रक योग्य नाही .पाच ते सहा ,सहा ते सात यावेळात पाणी सोडली जाते .त्यासाठी कोठे तरी पाणी सोडण्याचे वेळापत्रक असले पाहीजे . त्यासाठी नगरसेवकास दररोज 500ते 600कॉल अन्टेड करावे लागतात .कारण मा .आयुक्तांचा नंबर कोणाकडे नसतो .तसेच अधिकारी वर्गाचे देखील क्रमांक लोकाकडे नसतात .केवळ सदस्याचे क्रमांक त्यांचेकडे असतात .यासाठी आपण आयुक्त साहेब यात काहीतरी सुसुत्रता करण्यात यावी .जे मनपाचे टाकीवर लोक आहेत .त्यांना काही वेळेचे महत्व नाही किंवा गार्भिय नाही .त्यामुळे आपणास फेस करावे लागते .पाण्याच्या टाकी जवळचा थांबावे .जी पाण्याची वेळ आहे .त्याच वेळत पाणी सोडण्यात यावे.

**महापौर** या पाणी सोडण्याचा विषयावर चर्चा झालेली आहे त्यासाठी मा.आयुक्तांना सुचना देवून अमंलबजावणी करण्यात आलेली आहे .आपण जे मुददे विचारले आहे .त्या मुदयावर यापूर्वीच अमलंबजावणी झालेली आहे .मधल्या काळामध्ये विष्णूपुरीचे पाणी कमी झालेले होते .त्यावेळेस तशी परिस्थिती निर्माण झालेली होती .

**बाळासाहेब देशमुख** मला एक मिनीट बोलू दयावे .मी पाण्याबाबत बोलत आहे .मला बोलू दयावे.

**उमेश चव्हान** यांना बोलू दयावे आम्ही एका तासानंतर बाहेर जावून येतो.

**शेख बावजीर** आमचे रोजे आहेत .आम्हाला लवकर जाणे आवश्यक आहे त्यासाठी विषय पत्रीका सुरु करावी.

**उमेश चव्हान** अजेन्टा चालू करावा .त्यांना मिटींग सम्पल्यांनतर एक तास वेळ देण्यात यावा विषय पत्रिका चालू करावी.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना(** माझ्या वार्डाचा पाण्याचा प्रश्न अंत्यत गंभिर प्रश्न आहे तो प्रश्न मला मांडू दयावा .एवढा पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे की ,अंजेन्डा महत्वाचा हे सांगा.

**सभागृह नेता** सभापती ,स्थायी समिती व स्थायी समिती सदस्यांना मी धन्यवाद देतो की ,अतिशय चांगले बजेट सादर केलेले आहे .जे काही विकास कामासाठी निधी ठेवण्यात येतो नगराचा विकास करण्यासाठी नगरसेवक निधी ठेवण्या येतो नगरसेवक निधी किंवा वार्ड विकास निधीसाठी फंड उपलब्ध होत नाही .त्यासाठी शासनाचा जीआर आहे .त्यासाठी वेगळे अंकाऊट खोलण्यात यावे .या बजेटच्या संदर्भात ज्या नगरसेवकाच्या ज्या काही लेखी सुचना येतील त्या लेखी सुचना घेण्यात याव्यात त्यामध्ये फेरफार करण्याचे अधिकार महापौर यांना देण्यात येतात .मागील दिड वर्षापुर्वी मनापचे उत्पन्नात वाढ करण्यासाठी आयुक्तांनी प्रयत्न केले .त्याच प्रमाणे आपण देखील मनपाचा महसुलात वाढ करणार अशी अपेक्षा व्यक्त करतो .जे नगरसेवक कामे सुचवतील ते ते कामे सुचवितील ती कामे अड करण्यात यावे व बजेट पास करण्यात यावे.

**शेख बावजीर** पाण्याचा गंभीर प्रश्न आहे व आमची ईद आहे त्यासाठी त्या प्रश्नाचा प्रथम खुलासा करण्यात यावा.

**स.सरजितसिंघ गील** बजेटमध्ये नगरसेव आले ज्या काही सुचना आहेत .त्या सुचना त्यात सुमावेश करुन जो काही फेरफार करावयाचा आहे त्याचा पुर्ण अधिकार महापौरांना देण्यात येतात.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना(** मा.महापौर मॅडम ,मी जो पाण्याचा प्रश्न मांडत आहे.त्या प्रश्नावर आपण उत्तर देत नाही .माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे .एक स.सदस्य पाण्याच्या प्रश्न विचारत आहे .त्या प्रश्नावर आपण उत्तर देत नाही .हे काही बरोबर नाही.आपण पाण्याच्या प्रश्नावर उत्तर दिले पाहीजे.

**स .जानी** आम्ही जो पाण्याचा प्रश्न विचारा आहे त्या प्रश्नावर आपण उत्तर देत नाही .जे आपणास जे वाटत आहे त्या विषयावर चर्चा करीत आहात .इतर पाण्याचा प्रश्न महत्वाचा नाही काय ? आमच्या घराचा प्रश्न नाही त्या प्रश्नाचे उत्तर महापौरांनी दिले पाहिजे .आमचा पाण्याचा प्रश्न आहे तो प्रश्न सोडविला पाहीजे.

**बाळासाहेब देशमुख )शिवसेना(**मी पाण्याचा प्रश्न मांडत आहे .त्यासाठी कार्यवाही करावे मग तुमचे देखील नगरसेवकसमोर आले होते त्यांच्यावर ही निलबंनाची कार्यवाही करा .मी एकटाच या ठिकाणी आलो नाही इतर नगरसेवक पुढे आले होते त्यांच्यावर देखील कार्यवाही करावी .मी पाण्याचा प्रश्न मांडत आहे म्हणुन माझ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करता काय ?

**सभागृह नेता** दोन विषय सोडवून त्यापैकी एक आकृतीबंदाचा विषय सोडून अजेन्डा पास करण्यात यावा.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना** (वारंवार पाण्याच्या प्रश्नासाठी मला सस्पेंड करु दया अशी मागणी करत होते.

**गोंधळ चालु होता.**

**स.जानी** किती वेळा आम्ही आश्वासनावर रहावे .पाण्याच्या प्रश्नावर ठोस खुलासा करण्यात यावा.

**विनय गिरडे** अजेंन्टा पास करण्यात यावा.

**स.जानी** अजेंन्टा पास करावा परंतू माझ्या पाण्याच्या प्रश्नावर प्रथम खुलासा करावे त्यानंतर अजेन्टा पास करावा.

**महापौर** थोडक्यात आपण बोलावे.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना(**मागील चार महीण्यापासुन माझ्या प्रभागामध्ये पाण्याचा उचलला आहे .आपण सुध्दा वृतपत्राच्या माध्यमातुन वाचले असेल .आपण तीन दिवस आहे .पाणी पुरवठा करण्यात येत आहे .पाण्याचा प्रश्न सुटेल म्हणुन आपण शाश्वती दिला होता .आता 15दिवस झाले पाण्याचा प्रश्न सुटला नाही .मी पाणी पुरवठा विभागाच्या अधिका-याचे स्वागत करतो .भर उन्हाळयामध्ये पाण्याची तीव्र टंचाई असतांना त्या काळात श्री वाघमारे साहेब व श्री अंधारे साहेब यांनी पत्र दिवस काम केले त्यांचे अभिनंदन करतो .एकादया अधिका-यांने चांगले काम केले तर शाब्बासकी दिली पाहीजे.

**विरोधी पक्ष नेता** एखादा नगरसेवक बोलत असेल तर बोलू दया .एकादया अधिका-याने चांगले काम केले तर त्याच कौतूक करीत असतील तर करु दयावे.

**उमेश चव्हान** जे अधिकारी चांगले काम करतात .ते उमेश चव्हान यांना परत नाही त्यांच कौतूक होत असेल तर कौतूक करु दयावे.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना(**श्री अंधारे साहेबानी भर उन्हायात चांगले काम केले त्यांच मी अभिनंदन करतो .त्या पावसाळयात माझ्या प्रभागात 15दिवस झाले पाणी येत नाही .त्यांना सुचना दयावे की ,पाणी योग्य पध्दतीने माझ्या प्रभागात देण्यात यावे अशा सुचना दयाव्यात .माझ्या प्रभागात कच्चे रस्ते असल्यामुळे आता माझा प्रभाग हा जलयुक्त शिवार झालेला आहे .त्यामुळे एएमआरसीच्या माध्यमातून मुरुम,गीटटी टाकण्याचे आदेश दयावे.

**विनय गिरडे** पाण्याचा प्रश्न मांडून ते कोणत्या प्रश्नावर गेले हे सांगावे.पाण्याच्या प्रश्न मांडला पाहीजे होता त्यांनी तर दुसराच प्रश्न मांडला आहे.

**बाळासाहेब देशमुख)शिवसेना(**अहो, माझा प्रश्न आहे .तुम्हाला काय करावयाचे आहे .आता माझ्या मुसलमान बांधवाना रोजा सोडायला जावयाचे आहे त्यासाठी आता अजेन्डा चालू करावा.

**स .जानी** जन्म-मृत्यूच्या प्रमाणपत्राबाबत मी उल्लेख केलेला आहे .त्याच्या संदर्भाने खुलासा करावा यामुळे नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे.

**सविता कंठेवाड** या सभागृहात प्रत्येकांना बोलण्याचा हक्क आहे सर्वच जन निवडूण आलेले आहेत .विशिष्ठ लोकांना बोलण्याचा अधिकार नाही .सर्वानाच सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे अजेन्डा चालू करण्याची रुलींग यांचेकडे नाहीत किंवा ते विरोधी पक्ष नेते नाहीत तरीही ते बोलतात .त्यासाठी महीलानाही बोलू दयावे .मागे मिटींग घेवून सांगण्यात आले होते की ,माझ्या प्रभागातील श्रीरामनगर,रायगड नगर या भागातील ड्रेनेजेची कामे आतापर्यत झालेली नाहीत 6 .महीण्याचा कालावधी होवून गेला आहे .रामनगरमधील ड्रेनेजची कामे कधी पुर्ण होणार याचा खुलासा करण्यात यावा.पहील्याच पावसात माझ्या प्रभागातील नागरीकांच्या घरात पावसाचे पाणी शिरले होते .संबंधीत विभाग प्रमुखास तश्या सुचना दिल्या होत्या काही भागातील ड्रेनेजचे त्यांचे प्रभागातील कामे पूर्ण केले आहेत परंतू माझ्या प्रभागातील कामे का करण्यात आली नाहीत .केवळ ड्रेनेज लाईनची जोडणी करण्याचा विषय आहे.

**महापौर** या प्रश्नावर मा .आयुक्तांनी खुलासा करावा.

**आयुक्त** मा.महापौर महोदया,स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे .त्या प्रभागातील समस्याची पहानी करुन स्वत :भेट घेईल .ड्रेनेज कनेक्शनचा प्रश्न आहे त्या ठिकाणचे ड्रेनेज कनेक्शन आपल्याला त्वरीत करुन दिले जाईल.

**हबीब बागवान** एसटीपी प्लॉन्ट माझ्या वार्डात झाला आहे .माझ्या वार्डाचे पाणी जात नाही ते कैंव्हा जाण्यासाठी नियोजन करणार आहात याचा खुलासा करावा.

**बाळासाहेब देशमुख )शिवसेना(**दलीत वस्तीच्या निधीच्या संदर्भात मी प्रश्न विचारा होता त्या प्रश्नाचा खुलासा करण्यात आला नाही . त्याचा आधी खुलसा करण्यात यावा.

**हबीब बागवान** माझ्या वार्डात चेंबर बनवण्याचे काम शिल्लक राहीले आहे .ते कामे शिल्लक राहील्यामुळे लोकांचा मृत्यू झालेला आहे .त्या चैंबरचे काम कैंव्हा पुर्ण करणार याचा खुलासा करावा .एसटीपी प्लॉन्ट आमच्या एरीयात होवून आम्हाला त्याचा फायदा नाही .हा प्लॉन्ट बनवून काय आमच्यासाठी उपयोग आहे याचा खुलासा आता झाला पाहीजे.

**आयुक्त** मा .महापौराच्या परवानगीने बोलतो .स .सदस्यांनी जे कनेक्टीव्हीचा प्रश्न विचारला आहे .शहरामध्ये ज्या-ज्या भागामध्ये कनेक्टीव्हीटी करावयाची राहीला आहे .त्या-त्या भागामधील कनेक्टीव्हीटीची कामे तातडीने करण्यात येतील.अर्धवट जी स्कीम राहीलेली आहे .ती पूर्ण करण्याचे निश्चीतपणे करण्यात येतील .नांदेडकर जनतेस दिलासा दिला जाईल .दलीत वस्तीचा निधी का वापस गेला आहे याची माहिती घेतो आणि नविन निधी लवकरात लवकर कसा आणता येईल त्यासाठी माझ्या पध्दतीने निश्चीतपणे प्रयत्न करतो .हा निधी सर्वाच्या सहकार्याने निधी वापर करण्यात येईल.

**स .जानी** मी पाण्याच्या संदर्भात प्रश्न केला होता की ,तीन दिवसा आड पाण्याचा व जन्म-मृत्यू प्रमाणपत्राच्या संदर्भात प्रश्न विचारला होता.त्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

**आयुक्त** पाण्याच्या संदर्भात आपण जो प्रश्न उपस्थित केला आहे .आपलया प्रभागाची व्हीजीट करुन त्याची त्वरीत सोडवून करण्यात येतील.

**स. जानी** वार्डाचा प्रश्न नाही पुर्ण नविन एरीयाचा प्रश्न आहे .ज्या एरीयामध्ये पाणी पुरवठा होत नाही.

**आयुक्त** उन्हाळयात पाणी आले नाही आता उन्हाळे आलेले आहेत .आता पाणी घेवून येतील उन्हाळे याची आपण काळजी करु नका .

**स. जानी** जन्म-मृत्यू प्रमाणपत्राच्या संदर्भात सुध्दा खुलासा करा ना साहेब.

**विरोधी पक्षनेता** जन्म मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठी टॅक्स भरण्याची काही गरज नाही .जन्म-मृत्यूचे प्रमाणपत्रासाठी टॅक्स ची अट शिथील करण्यात यावी .जे किरायदार आहेत.घर मालकाला टॅक्स भरण्यासाठी फोर्स करावा काय .ते घर मालक यांच्यासाठी घर टॅक्स भरणार नाहीत ,ही अट शिथील करावी.

**आयुक्त** मा .महापौरांच्या परवानगीने ,जन्म – मृत्यूच्या संदर्भात जो टॅक्स घेण्यात येतो त्याचे सोलूशन काढण्यात येईल.

**विरोधी पक्षनेता** एखादया किरायदाराच्या घरी मुल जन्माला आले आणि मग त्यांने घर मालकाला सांगावे काय ? टॅक्स भरा म्हणुन .हे योग्य नाही.

**महापौर** किरायदारासाठी अडवणूक केली जात नाही त्यांना प्रमाणपत्र देण्यात येतात.

**विरोधी पक्षनेता** आम्ही या कार्यालयात दररोज बसतो ते नागरी आमच्याकडे येतात .त्याचा त्रास आम्हाला होतो.

**महापौर** किरायदारासाठी हा नियम आजपासून शिथील करण्यात येतो.

**स्नेहा पांढरे** मा .महापौर,मा .आयुक्त साहेब माझ्या प्रभागासाठी शासनाकडून जो निधी आला आहे त्याचे 7 महिने झाले साधे पेपर वर्क आता पर्यत पुर्ण झाले नाही त्याचा मला खुलासा दयावा .तुम्ही कार्यकारी अभियंता श्री कदम साहेबाकडून विचारुन घेवून मला खुलासा दयावा.

**विरोधी पक्षनेता** महापौरांना विकास करावयाचा नाही.

**स्नेहा पांढरे** दलित निधी गेली म्हणून त्यावर चर्चा करणे उपयोगाचे नाही पण हा निधी आता आहे त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे .या निधीला पण परत पाठवावयाचे आहे का ? हे सांगा.

**सभागृह नेता** आमच्या ताईने जो प्रश्न मांडला आहे .तो निधी 02.20कोटीचा निधी शासनाने त्यांचे प्रभागाचा विकास करण्यासाठी दिलेला आहे .मनपाने रितसर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडे सादर केला होता .तो प्रस्ताव त्यांनी विभागीय आयुक्तांकडे पाठविला .मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यात पहानी करुन मा.जिल्हाधिकारी यांना अहवाल देण्यासाठी सांगितले आहे .या स्टेजला ते प्रकरण थांबले आहे .ते काम कसे पूर्ण करता येईल यासाठी पाठपुरावा करुन हे प्रकरण अंतिम करावे.

**स्नेहा पांढरे** पेपरवर्क पुर्ण करुन वार्डात कधी काम सुरु होणार याची मला शाश्वती दयावे ,म्हणजे मी लोकांना तोंड दाखवेन .मला प्रश्न विचारले जातात .मला वार्डात जावे लागते .सर्वच मला प्रश्न विचारीत असतात त्यामुळे मला वार्डातील नागरीकांना उत्तर देणे कठीण होत आहे .यासाठी तो निधीतील कामे केव्हा करणार याचा खुलासा देण्यात यावा.

**आयुक्त** आता जे प्रश्न विचारला आहे .त्या अनुषंगाने शहरामध्ये जे केंद्र राज्य सरकारकडून निधी मिळाला आहे .त्या सर्व निधीचा उपयोग केला जाणार आहे .आपला जो स्पेसीफिक निधी कोणता आहे त्याची मला कल्पना नाही .आपलाच नाहीत जे नगरसेवक त्यांचे वार्डासाठी केंद्र राज्य सरकारचा निधी आला आहे किंवा येणार आहे .तया निधीचे कामे पुर्ण करण्यासाठी आम्ही एक टास्क फोर्स उभा करणार आहोत .कोणताही शासनाचा निधी परत जाणार नाही याची मी आपणास शाश्वती देतो . स्पेसिफीक जो निधी आपल्या वार्डासाठी आला आहे त्याची माहिती घेतो ती माहीती आपणास देण्यात येईल .तो निधी खर्च करण्यात येईल याची मी शाश्वती देतो.

**महापौर** बजेटची मिटींग सुरु करण्यात यावी.

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले व स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार केलेल्या शिफारशी नुसार सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत.

**विनय गिरडे** माझी अशी विनंती आहे की ,प्रत्येक नगरसेवकाच्या वार्ड विकास निधी ठेवला होतो ते निधीचे कामे आता सुध्दा निघालेले नाही .जो पर्यत तो वार्ड विकास निधी काढत नाही तोपर्यत ही बजेटची बैठक 4ते 5दिवसापर्यत पोस्ट पॉऊंड करावी .आपण बजेट मंजूर करतो आणि आपला वार्ड विकास निधीची कामे होत नाहीत .मग बजेट पास करुन काय उपयोग हे मला सांगावे.

**महापौर** बजेट पास करण्यासाठी बराच कालावधी झाला त्यामुळे बैठक पुढे ढकलण्यात येणार नाही .बजेटची मीटींग सुरु ठेवावी.

**विनय गिरडे** आम्ही बजेट पास करतो .एकमताने तर आमच्या प्रभागातील कामे वर्ष वर्ष होत नसतील बजेट पास करण्यास काय उपयोग आहे .काय आम्ही बजेट पास करण्यासाठीच आहोत काय ? हे कामे तात्काळ काढावे नंतर मिटींग घ्यावी .

**डॉ.करुणा जमदाडे** बजेटचा अभ्यास करण्याकरीता वेळ दिला आहे .आताच आयुक्तांनी खुलासा केलेला आहे की , शहरांच्या विकासाच्या विरोधात नाही.

**विनय गिरडे** आम्ही सुध्दा शहराच्या विकासचे विरोधात नाही .आमचे कामे होत नसतील बजेट कशा करीता मंजूर करावे.

**सभागृह नेता** वार्डात विकास निधी ठेवलेला आहे .तो निधी पुर्णपणे खर्च होत नाही ही बाब सत्य आहे .यात काही शंका नाही .यात आढावा घेतला तर लक्षात येईल त्याची कारणे अनेक आहेत.काही कामे निघाले नाही जे कामे निघाली आहेत .त्याचे टेन्डन कोणीही घेण्यास तयार नाहीत .अशा प्रकारची परिस्थिती आहे. नगरसेवकांना आता कामाचे सजेशन दयावे किंवा नाही याच्या विचारात आहेत . सर ,नविन असलयाने त्यांना थोडी कल्पना देवू इच्छीतो की ,नगरसेवकाच्या शिफारशीने वर्षातून केवळ 10लक्षाचे कामे करण्यात येतात .ही कामे मागील दोन वर्षापासनू होत आहेत .पण आम्ही बघतो किंवा आपण आढावा घेतला तर लक्षात येईल की ,सन 2012ला आम्ही निवडून आलो .त्या वर्षाचे वार्डातील झालेलया कामाचे देयक आतापर्यत देण्यात आलेले नाही .आम्ही दुस-यावर्षी तीस-या वर्षी कामे काढत गेलो .काही ठिकाणी कामे निघाले काही ठिकाणी निघाले नाहीत .आता चौथ्यावर्षी आम्ही सांगत आहोत की आमच्या वार्ड विकास निधीचे कामे काढण्यात यावी .कामे करीत असतांना लक्षात येते जे पैसे मिळत नाहीत त्यामुळे कोणताही कंत्राटदार कामे करण्यास तयार होत नाही . नगरसेवक स्वेच्छा निधी आहे .ती रु 10.कोटी पेक्षा जास्त निधी नाही .आम्ही या ठिकाणी रु 100. कोटीचे बजेट पास करीत असतांना नगरसेवकांचे फक्त रु 10.कोटीचे रुपयाच्या निधीला जर बजेट उपलब्ध होत नसेल तर ते बजेट पास का करावे असा प्रश्न नगरसेवकांच्या उपस्थित करतात त्यात त्यांची काही चुक नाही .शासनाचे मार्गदर्शन सुचना आहेत .शासन निर्णय आहेत .जे विकास शुल्क वसुल होतो ,त्याचे सर्व खर्च वार्डातील कामे करण्यासाठी करण्यात यावा .शासन निर्णयामध्ये उल्लेख आहे की विकास शुल्काची जी रक्कम आहे ती रक्कम नगरसेवकाचे वार्ड निधी म्हणुन एका बँकेत स्वंतत्र अंकाउट ओपन करावे .तो निधी त्या अंकाऊटमध्ये जमा करण्यात यावा .अशी मागणी सर्वच नगरसेवकांची आहे .ती आतापर्यत सर्व नगरसेवकांची मागणी पुर्ण झालेली नाही वार्ड विकास निधीसाठी शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणेवेगळे खाते ओपन करावे .तो विकास शुल्काची जमा होणारी रक्कम त्या खात्यात जमा करावी .जेणे करुन नगरसेवकांने सुचविले .वार्डातील कामाचे

पेमेंट देणे सोईचे होईल आणि मा.स्थायी समिती सभापती ,सौ अनुजा तेहरा मॅडम यांनी व स्थायी समिती सदस्यांनी सादर केले आहे ,त्यांनी खुप चांगले बजेट दिलेले आहे .त्यांचे सर्वाचे अभिनंदन करतो .त्यांनी मा .आयुक्त साहेबांना विनंती करतो की ,मागील दिड वर्षाच्या काळात वसुली करण्यासाठी मनपा प्रशासन व आम्ही सुध्दा वसुली करण्यासाठी कमी पडलो .मनपाची जेव्हढी कॅपीसिटी आहे .तेव्हढे उत्पन्न आम्ही मिळु शकलो नाही .मागे श्री निशिकांत देशपांडे साहेबांनी जे टारगेट समोर ठेवले होते की ,मनपाचे जे दायीत्व आहे. ते संपवुन 10कोटीचा निधी शिल्लक ठेवतो त्यांनी जी वसुलीची स्पीड पकडली होती ती अभिनंदनिय आहे .श्रीकांत साहेब असो ,कि देशपांडे साहेब असो या एक पायंन्डा मनपा दिला होता 20 .ते 25कोटी रुपयाचे हार्डशिपच्या माध्यमातून नगररचना विभागाकडून मिळालेले आहे .असता एलबीटी बंद झाल्यामुळे दोनच पर्याय शिल्लक आहेत .एक मालमत्ता कराची वसुली व नगररचना विभागाचे बांधकाम परवानगीचे प्रकरण आहेत हे दोनच उत्पन्नाचे स्त्रोत आहे.मालमत्ता कराची वसुली करीत असतांना आपण कमी पडलो आहे . परंतू नांदेड मनपा ही एकमेव मनपा आहे की ,रेडीरेकनरच्या पध्दतीने टॅक्स लावण्याचे धोरण अवलंबिले आहे .महाराष्ट्रात जी चांगली शैली आहे ती फक्त पहीले नांदेडमध्ये राबवित असतो . रेडीरेकनरचे टॅक्स हा नांदेडकरांने देखील स्वीकारले आहे .ते सुध्दा टॅक्स भरत आहेत .त्या टॅक्समध्ये अनाधिकृत बांधकाम शास्ती त्याच्या सोबत लावण्यात आलेली आहे .जो टॅक्स आहे त्यामध्ये लोकांना तिपट टॅक्स जात आहे .लोक आज टॅक्स भरण्यास तयार आहेत .ई गर्व्हन्स करण्यात आले ते होत असतांना लोकांनी टॅक्स हा एप्रीलमध्ये भरला आणि आपल्या वसुली लिपीकाने तो टॅक्स ऑगस्टमध्ये एन्ट्री घेतली .पुन्हा त्यांना ती शास्ती लागली आहे .जेव्हा डीमांड नोटीसा देताना त्यांत सुधारणा केल्या नाहीत .त्यामुळे संगळया गोष्टीची दुरुस्ती झाली पाहिजे . आपणास मालमत्ता कराची रु 100कोटीची वसुली करावयाची आहे.ज्या मालमत्ता धारकाने बांधकाम परवानगी घेतली आहे त्या मालमत्ता धारकांना बांधकाम शास्ती लावण्यात आली आहे .ती बांधकाम शास्ती रदद करण्यात यावी .ज्याने बांधकाम परवानगी घेतली नाही त्यांना बांधकाम शास्ती लावण्यात यावी .जर बांधकाम परवानगी घेतली असेल आणि थोडे फार कमी अधिक झाले असेल तर त्यांना थोडी सवलत देण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन मागवून त्यात काही कमी करता येते का ते करावे .त्यामुळे मालमत्ता कर टाईपअप होईल .त्यासोबतच जे श्री श्रीकांत सर व श्री देशपांडे सरांनी राबविलेली मोहीम त्याचा इनपॅक्ट आठ महिने होता .लोक स्वतःहुन हार्डशिप करुन घेवू लागले ,पैसे भरु लागले .या बजेटच्या माध्यमातून असे सांगू इच्छीतो की ,मनपाचे जे मुख्य स्त्रोत आहेत .जसे की ,मालमत्ता कराच्या बांधकाम शास्तीमध्ये कसा बदल करता येईल याबाबत थोडा विचार करावा . नगररचना विभागातील हार्डशिप असो की गुंठेवारी असो नागरीकांना यातून कसा दिलासा मीळेल याबाबतचा आपण विचार करावा .आता मनपाला अच्छे दिन आल्याशिवाय राहणार नाहीत .मनपाचे नगरसेवकाचा जो रोष आहे तो रोष कमी करता येईल हे पहावे .विकासाचा निधी आला तरच विकास करु पण रु 100कोटीच्या बजेटमध्ये 10कोटीचेच कामे नगरसेवक सुचवित असतात त्यांचे सुचनेप्रमाणे वार्डातील कामे करावे .त्यांचे वार्डातील कामासाठी निधीचे स्वतंत्र खाते कसे काढता येईल याबाबतचा विचार आपण करावे .सर्व नगरसेवकांना मी विनंती करतो की बजेटच्या संदर्भात काही सुचनाआहेत त्या सुचना मांडाव्यात .मा .महापौर मॅडम ,आपणास विंनती आहे की , नगरसेकवकाचे वार्डातील जे काही करावयाचे आहेत .त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेवून त्या बजेटमध्ये त्या कामाचा समावेश करण्यात यावा .त्या पध्दतीने बजेटमध्ये दुरुस्ती करण्यात यावी बजेटमध्ये फेरबदल सर्व अधिकार मा .महापौर यांना प्रदान करण्यात यावे ,असे बोलून मी थांबतो.

**विरोधी पक्षनेता** मा .महापौर ,मॅडम जसे आता सभागृह नेता श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सांगीतल्याप्रमाणे ,आम्ही या ठिकाणी 100कोटी 200कोटीचे बजेट पास करतो आणि आमच्यासाठी कोणताही निधी राखीव ठेवला जात नाही .एखादया नगरसेवकाचे टेन्डर निघाले तर ते टेन्डर चार-चार वेळा निघून सुध्दा कोणी घेवून काम करीत नाही .कंत्राटदारास आम्हाला सांगावे लागते की ,आमच्या वार्डातील कामे घ्यावे म्हणून मागे लागावे लागते .ते कंत्राटदार म्हणतात आम्हाला पैसे भेटत नाहीत त्यामुळे आम्ही काम घेणार नाही असे म्हणतात .जसे सभागृह नेत्याने म्हटल्याप्रमाणे विकास शुल्काची जी रक्कम जमा होते ती रक्कम केवळ नगरसेवकासाठी रुपये 10कोटी राखीव ठेवण्यात यावे . जेणेकरुन एजन्सी आमच्या वार्डातील कामे करण्यात तयार होईल .आता दोन वर्षात निवडनुका आहेत .एखादया एजन्सीला काम दिले आणि त्यांने ती कामे केली तर त्याला दोन पैसे वेळवर मिळतील .उत्पन्नाचे स्त्रोत सांगतो ,नांदेड शहराचे दोन भाग आहेत या शहरात किमान 6ते 7 लक्ष लोकसंख्या आहे .मालमता या आपल्या रेकॉर्डला केवळ एक लक्ष 5हजार आहे .अमरावती , चंद्रपुर या महानरगपालिका या टॅक्सच्या वसुलीवर चालत असतात .मी त्याचा अभ्यास करुन आलो आहे.एका मालमत्ताधारकाचे चार घरे आहेत परंतू रेकॉर्डवर एकच घर आहे .त्या ठिकाणी आपला क्षेत्रिय अधिकारी जातो आणि काहीही तरी करुन ते घर रेकॉर्डवर लावले जात नाही .केवळ एकाच मालमत्तेवर टॅक्स घेतला जातो इतर मालमत्तेवर टॅक्स लावला जात नाही .मनपाच्या सर्व सुविधा या पुरविण्यात येतात पण टॅक्स लावला जात नाही .उत्तर नांदेड व दक्षिण नांदेडची लोकसंख्या तीन तीन लक्ष आहे तर घरे सुध्दा जास्त प्रमाणात निघू शकतात .मला असे वाटते की ,कोठेतरी पाणी मुरत आहे .त्यामुळे शहरातील सर्व मालमता या मनपाच्या रेकॉर्ड वर आल्या पाहीजे त्याशिवाय मनपाचे उत्पना वाढ होणार नाही .काबरानगरचा भाग आहे ते लोक मनपाच्या रस्त्याचा उपयोग करीत आहेत तर त्या लोकांकडून रोड टॅक्स वसुल करण्यात यावा .त्याशिवाय मनपाचे उत्पनात वाढ होणार नाही .

**फारुख अली खाँ** जे शासनाचा निधी मनपाकेस प्राप्त होतो तो निधी नगरसेवकांना योग्य रितीने वाटप करण्यात येत नाही जसे दलीतवस्तीचा निधी हा योग्य रितीने वाटप झाला पाहिजे .तो निधी वाटप करण्यात येत

नाही .या ठिकाणी अशी पध्दत आहे की ,जीस की लाठी उस की भैंस अशी अवस्था आहे .त्याच लोकांचे टेन्डर निघत आहेत इतर लोंकाचे नाही .त्यामुळे आम्हाला आमच्या वार्डातील लोकांना काय सांगावे हे कळत नाही .सर्वसाधारण सभा ही वाटपाचे काम योग्य रितीने केले पाहिजे सर्वच नगरसेवक हे निवडून आलेले आहेत .यादी सर्व साधारण सभेने केली तर ती योग्य पध्दतीने केली पाहीजे.एका प्रभागाला जास्त निधी एका प्रभागाला कमी निधी दिला जातो दुस-या प्रभागाला जास्त निधी दिला जातो हे योग्य नाही .शासनाच्या निधीचे वाटप योग्य पध्दतीने झाले तर आमचे कामे इतर निधीतून करण्याची आवश्यकता सुध्दा भासणार नाही .पण वाटपच योग्य होत नाही .आमच्या नगरसेवकावर अन्यात होत आहे .ही बाब अत्यंत गंभीर आहे .जो निधी शासनाकडून मिळतो तो निधी बराबर सर्वच वार्डात वाटप केला जावा अशी आमची विनंती आहे .जो नगरसेवक निधी आहे त्या निधीचे टेन्डर काढण्यात यावे हीच आमची मागणी आहे.

**विरोधी पक्षनेता** विषय पत्रिकेत एक विषय आहे की ,मनपाचे उत्पन्न वाढ करण्यासाठी एका वित्तीय सल्लागाराची नियुक्ती करण्यात यावी .मग आपण नगरसेवक आहोत आपणाला कळत नाही काय की मनपाचे उत्पन्न कसे वाढवावे .सल्लागाराची नियुक्ती करण्याची काय आवश्यकता आहे .आम्ही उत्पन्न वाढी साठी चांगलेच्या चांगले पर्याय सांगत असतो त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही ,आणि या वित्तीय सल्लागाराचे काय करणार हे कळत नाही .याबाबत खुलासा करण्यात यावा.

**महापौर** मनपाचे आयुक्त हे मनपाचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करीत असल्याने सदर विषय प्रशासनाने पाठविलेला आहे .म्हणुन वित्तीय सल्लागाराची निवड करण्याचा विषय आला आहे.

**विरोधी पक्षनेता** मनपाचे उत्पन्न वाढीसाठी वेगवेगळे उपाय सुचवित असतो .त्यावर अंमलबजावणी करण्यात येत नाही .या ठीकाणी तीन-तीन वेळेस चार-चार वेळेस निवडून आलेले नगरसेवक आहेत त्यांना मनपाचे उत्पन्न कसे वाढविता येईल याची चांगली कल्पना आहे .वित्तीय सल्लागार यांची नियुक्ती करुन मनपावर आर्थिक बोजा पडणार आहे कारण नियमीत कर्मचा-याच्या पगारी होत नाहीत तर त्याला मानधन कसे देणार आहोत .प्रत्येक बजेटला नगरसेवक हे सुचना करीत असतात .त्याकडे दुर्लक्ष केले जाते .काय वित्तीय सल्लागाराचे आपण ऐकणार आहात .

**महापौर** बजेटच्या संदर्भात ज्या सुचना नगरसेवकाच्या असतील त्या विचारात घेवूनच बजेट तयार करण्यात येईल .नगरसेवकाच्या सुचना आल्यानंतर त्या सुचनाचा समावेश बजेट मध्ये करण्यात येईल त्या नंतरच बजेट हे अंतिम करण्यात येणार आहे.

**विरोधी पक्षनेता** शासनाचे अनुदान शंभर कोटी जमा बाजू मध्ये दर्शविण्यात आले आहे .ही रक्कम कशी येणार याचा खुलासा करावा .ग्रीन स्पेस साठी आपल्याला शासनाकडून निधी येणार आहे .आणि गुरुव्दा-यांकडून आपले शहरात झाडे लावण्यात आली आहेत त्यांना यापुर्वी 75लक्ष रुपये देण्याबाबतचा ठराव झाला होता .तर तो निधी त्यांना देण्यात यावा .कारण या निधी तुन त्यांना ट्री गार्ड घेता येतील अथवा मनपाकडून ट्री गार्ड घेवून दयावे .माझे तर असे मत आहे की ,गुरुव्दाराला एक कोटी रुपये दिले पाहिजे कारण त्यांनी नांदेडमध्ये मोठया प्रमाणात झाडे लावली आहे .गील महाराज या विषयावर नेहमी बोलत असतात बाबाजीचा सत्कार मनपाने का केला नाही त्यांनी एवढे झाले लावले आहे ती झाडे बाबाजीने जगवली सुध्दा आहेत त्यांचा का सत्कार केला नाही ,त्यांनी झाडा पाणी टाकले त्यांनी नांदेडला हरीत क्रांती केली त्यांना मोठपणा देण्यासाठी काय अडचण आहे त्यांचा सत्कार का करण्यात आला नाही .दरवर्षी आपण मनपाच्या बजेटमध्ये केवळ तरतुदच करतो त्याची अंमलबजावणी का करत नाही .गुरुव्दाराच्या लोकांनी किती चांगले काम केले आहे .आपण जसे लकराचा आपण सांभाळ करतो त्याच पध्दतीने त्यांनी झाडे लहानाची मोठी केली आहेत .त्याचा सन्मान केला पाहिजे .का त्यांना केवळ खुश करण्यासाठी कागदावर 50लाख ठेवले 75लाख रुपये ठेवले आहेत याचा खुलासा करण्यात यावा .राष्ट्रीय पुतळयाच्या शिर्षकाखाली बजेटमध्ये कालवश शंकररावजी चव्हाण यांच्या पुतळयासाठी निधी ठेवला आहे पण आताचे खासदार श्री अशोकराव चव्हाण यांनी शंकररावजी चव्हाण यांच्या पुतळयासाठी निधीची आवश्यकता नाही असे म्हणाले होते मग यामध्ये तरतूद का ठेवण्यात आली .त्यांना खुष करण्यासाठी निधी ठेवला आहे काय .

**अब्दुल सत्तार** आम्हाला पैश्याची गरज नाही .आम्ही पैसे मागणार नाही .बजेटमध्ये तीन वर्षा पुर्वीचे ठेवलेले शिर्षक आहे .आम्ही पैसे घेणार नाही.

**विरोधी पक्षनेता** केंद्रीय पध्दतीवर मनपाची शाळा उभी करण्याची एक तरतूद आहे .आता ज्या मनपाच्या शाळा आहेत त्याच शाळेची अवस्था बेकार आहे आणि इंग्रजी माध्यमाची शाळा घेवून काय करणार आहोत .सर्व विदयार्थ्यी हे खाजगी शाळेत जात असतात .एका तरी मनपाच्या शाळेत शिकणा-या गुणवंत विदयार्थ्याचा सत्कार झाला काय .ज्या शाळेचे लिकेजेस आहेत ते भरले जात नाहीत .जे शाळा आहेत त्या शाळांना जाण्यासाठी रस्ता नाही .ते प्रथम करण्यात यावे .मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्यांच्याकडे प्रथम लक्ष दयावे ......... .सर्व बजेट फुगीर बजेट आहे .केवळ 86कोटी रुपयाची उत्पन्न आहे.

**उमेश चव्हाण** आता विरोधी पक्षनेता यांनी बोलले आहे .मला वाटते ही बजेटची बैठक आहे .बजेटच्या बैठकीमध्ये बजेटवर बोललेतर चांगले होईल .स्थायी समितीने का घेतले आणि कसे घेतले ,कसा निधी येणार आहे .माझे मित्र श्री खेडकर यांनी पुर्ण बजेट वाचलेले दिसुन येत नाही .आम्ही जसे खर्चाची बाजूत वाढ केली आहे तर दुसरी बाजू आम्ही उत्पन्न वाढ करण्यासाठी सुध्दा उपाय सांगितले आहे . एलबीटीचे असेसमेंट केले नाही ते असेसमेंट केले तर उत्पन्नात वाढ निश्चीत वाढ होईल .मालमता टॅक्स आहे मागील दोन वर्षापासुन मालमता धारकांनी ऑनलाईन टॅक्स भरणा केला पाहीजे .ते ऑनलाईन टॅक्स भरतील परंतू तसे झालेले नाही .आपणास जवळपास 25टक्के वसुली आलेली नाही .तर मागच्या काळात श्री रत्नाकर वाघमारे साहेबांच्या काळात वसुलीची एकदम चांगली वसुली झालेली आहे .श्री रत्नाकर वाघमारे हे वसुलीला असो की ,मग एलबीटीला कि जकातमध्ये

असो त्यांनी मनपाच्या उत्पन्नात वाढच केलेली आहे .सध्या नांदेड शहरातील व्यापा-यांना कोणताही टॅक्स लावला जात नाही .त्यासाठी शहरातील व्यापा-यांना व्यवसाय परवाना म्हणुन पैसे घेतले जातात .व्यवसाय परवाना धारक आहेत त्यांना आपण कमीत कमी 3000ते 5000रुपये फी लावली तर आपल्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे .सध्या व्यापारी वर्गाची संख्या मोठया प्रमाणात आहे माझे मत असे की ,शहरात लहान मोठे धरुन पन्नास हजार ते साठ हजार व्यापारी असतील .त्यांच्याकडून व्यवसाय परवाना टॅक्स घेण्यात यावा .सध्या मालमत्ता कराची वसुली तर करता येईल ,सध्या एलबीटी ,जकात कोणताही टॅक्स नाही .त्यामुळे हा टॅक्स लावण्यात यावा .ज्या पध्दतीने आम्ही खर्च दाखविला आहे त्या पध्दतीने आम्ही उत्पन्न वाढीचे साधन पण सांगीतले आहे .आज विरोधी पक्षनेता जे म्हणतात त्यांच्या पक्षाचे दोन तीन नगरसेवक स्थायी समितीमध्ये आहेत त्या नगरसेवकांनी बजेटचे स्वागत केले आहे .स्थायी समितीने बजेट हे सर्व साधारण सभेमध्ये सादर केले आहे .सर्व साधारण सभेमध्ये त्यात काय सुधारणा करता येतात ते सुचवल्या पाहीजे .तो सभेचा अधिकार आहे .हे कसे केले असे काही मत मांडू नये.मनपाचे उत्पन्न वाढण्याचे तुमच्या मनामध्ये काही सुचना असतील त्या सुचना सभेमध्ये मांडण्यात यावे .आम्ही उत्पन्न वाढी साठी एजन्सी लावण्यात यावी असे सुचविले आहे ,त्याऐवजी तुम्हाला काय सुचवावयाचे आहेत ते सुचवावे .किंवा आपणास सुचविता येत नसेल तर एजन्सी लावून उत्पन्नाचे साधने त्या एजन्सीकडून घ्यावे .या ठिकाणी केवळ खोडया काढू नये .तुम्ही आम्ही या ठिकाणी विकासासाठी येथे आलेलो आहोत .त्यासाठी मनपाचे उत्पन्नाबाबत चर्चा करु ते उत्पन्न कसे वाढ करता येईल हे पाहू .आताच स .विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सांगीतल्या प्रमाणे स्थायी समितीने सादर केलेले बजेट हे खुप चांगले बजेट आहे .त्यासाठी आपण सर्वसाधारण सभेमध्ये मांडून पास करण्यात यावे .काही नगरसेवकाच्या सुचना असतील त्यात ते समावेश करण्यात यावा आणि बजेट पास करण्यात यावे.

**स. शेर अली** आता प्रथम विरोधी पक्ष नेता ,त्यानंतर सभागृह नेता व नंतर गटनेता यांना बोलण्याची परवानगी देण्यात यावी .आपण नगरसेवकांना का बोलू देता.

**शेख बावजीर** आता जे बजेट स्थायी समितीने सादर केलेले आहे .त्या बजेटला एआयएमआयएमची पार्टी अजीबाद सहमत नाही .त्याचे कारण असे की ,जुन्या नांदेड शहराला यामधून पुर्णपणे ढावलण्यात आलेले आहे .तसेच मॉनारीटीजसाठी कोणताही फंड राखीव ठेवण्यात आलेला नाही .मुस्लीम बहूलक्षेत्र असुन देखील त्यात समावेश नाही .बजेट हे विशिष्ठ पध्दतीचे नसते त्यात सर्व गोष्टीचा समावेश असने आवश्यक असते .विशिष्ठ वार्ड विशिष्ठ भाग म्हणुन बजेट तयार होत नसेत त्यात सर्व समावेशबाबीचे असणे गरजेचे आहे .या बजेटमध्ये जाणीवपुर्वक रित्या नाकारले आहे .मॉनारीटीज एरीयाला वंचीत ठेवले आहे .म्हणुन मी असे सुचवितो की ,जुन्या नांदेड शहरातील सर्व मॉनारीटीज सदस्याकडून त्यांच्या सुचनाचा समावेश करुन नव्याने बजेट तयार करावे तशा सुधारणा करण्यात यावे.

**स. शेर अली** मागच्या गणपती विसर्जणाच्या वेळी फार मोठा अपघात होता -होता राहीला आहे .आम्ही फार नसीबान आहोत .परंतू भविष्यात अशा घटना घडल्यातर फार मोठी अडचण निर्माण होवू शकते . त्याकरीता फायरस्टेशनचे एक सब सेंन्टर चालू करावे .मा .जी श्रीकांत सरांनी त्या सब सेन्टरला मान्यता दिली होती .परंतू आता पर्यत त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही .भविष्यात काही अनुचीत घटना घडू नये अशी माझी विनंती आहे.

**अशोक उमरेकर** श्री शेर अली यांनी जो फायर ब्रिगेडचा विषय काढला आहे तो विषयी त्यांनी मागच्या वर्षी देखील सभागृहात मांडला होता .जुन्या नांदेड मध्ये फायर ब्रिगेडची अत्यंत आवश्यकता आहे .त्या एरीयामध्ये फायर स्टेशन देण्यात यावे .फायर अधिकारी हे खुप चांगले काम करीत आहेत , त्यांनी आपला जिव धोक्यात घालून .लोकांचे जिव वाचविण्याचे काम करीत आहेत .जीवदान देत आहे .अशा कर्तव्य दक्ष अधिका-याचा पुष्प गुच्छ देवून सत्कार केला पाहीजे .मी मा .महापौर ,मा . आयुक्त साहेब यांना विनंती करतो की ,अग्निशमन अधिकारी यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करावा , अभिनंदन करावे अशी माझी प्रामाणिकपणे इच्छा आहे.

**महापौर** कोणाचा सत्कार आता करावयाचा नाही .आपण आता खाली बसावे.

**डॉ.करुणा जमदाडे** आपण प्रतीवर्षी बजेट तयार करतो .त्या बजेटमध्ये कोणत्या वार्डाकरीता कीती निधी ठेवला आहे . याची माहीती आम्हाला सभागृहात देण्यात यावा .त्यानंतर बजेट पास करावे .मा .सभापती यांनी चांगल बजेट सादर केलेले आहे त्यांच अभिनंदन .पण मा .सभापती मॅडम यांनी त्यांच्या मनोगतामध्ये ,महापौर व इतर मान्यवराचे उल्लेख केला आहे .यावरुन असे दिसुन येते की ,त्यांची मनुस्मृतीच्या माध्यमातुन चार भिंतीमध्ये स्त्रीला बंधीस्त केलेले आहे अशी त्यांची मानसीकता दिसते .डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांची शक्ती ओळखली होती ,त्यांचे कौशल्य ओळखले आणि घटनेच्या माध्यमातुन त्यांनी स्त्रीयांना राजकीय ,सामाजिक असेल या प्ल्याटफॉम वर आणुन सोडले आहे .स्त्रिला घटनेच्या माध्यमातुन सामाजिक न्याय मिळुन दिलेला आहे .त्यांना सन्मान मिळुन दिला आहे .एवढे मोठे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे .मा .सभापती मॅडम यांनी त्यांच्या मनोगत वाचतांना अस लक्षात येते की ,ज्या डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला आत्म सन्मान ,अधिकार ,हक्क मिळुन दिले .हक्क ,अधिकार मिळुन दिले .या मनोगतामध्ये त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा उल्लेख केला नाही .मा .सभापती मॅडम यांना सभापती होण्याचा मान केवळ डॉ.बाबासाहेबांनी लिहलेल्या घटनेमुळे मिळाला आहे .त्यामुळे डॉ.बाबासाहेब यांच्या नांवाचा उल्लेख करणे गरजेचे होते त्यांनी तो उल्लेख केला नसल्यामुळे या ठिकाणी मी खंत व्यक्त करते . मी सभागृहाला विनंती करते की ,जे बजेट आपण सादर केले आहे त्या बजेटचा कितवा हीस्सा प्रभागासाठी ठेवण्यात आला आहे याची प्रशासनाने सभागृहाला माहिती दयावी .खर्च झालेले बजेट सभागृहाच्या समोर आणावे आणि त्यानंतर बजेट पास करण्यात यावे.

**आनंद चव्हाण** मी सभागृहाला विनंती करतो की ,श्री बंडू खेडकर यांनी सांगीतल्याप्रमाणे मनपाच्या हददीमध्ये एक लाख चार हजार मालमत्ता आपल्या मनपा रेकॉर्डवर आहेत .निश्चीतच मनपा हददीमध्ये या पेक्षा जास्त मालमत्ता आहेत यासाठी सर्व मालमत्ता मनपाच्या नांवावर घेण्यासाठी एका खाजगी एजन्सीकडुन किंवा आपल्या कर्मचा-या मार्फत कर पुनरमुल्यांकन करुन घ्यावे .स्थायी समितीने जे बजेट दिले आहे ते बजेट चांगले बजेट दिले आहे .त्याबददल त्यांच अभिनंदन करतो .आपण मनपाकेकडून जे अनुदान देतो ते अनुदान कमी करावे असे आपण म्हणता की ,पंदे कंस्ट्रक्शनला एक-एक कोटी दिड-दिड कोटी रुपये माफ करता .असे पैसे माफ करतो त्यासाठी काही आळा घालता येईल काय हे पहावे .मा .आयुक्त साहेब आपण अत्यंत हुशार ,अनुभवी व मुरबी आहात अशा खर्चावर आपण आळा घालता येईल काय हे पहावे.

**गफार खान** मा .महापौर साहीबा ,मा .आयुक्त साहेब ,पैज नंबर 8वर जे उल्लेख आहे .शॉपींग कॉम्पलेक्स बांधने ,बंजारा हॉस्टेलचे शॉपींग कॉम्पलेक्स बांधने .याबाबत माझी अशी सुचना आहे की ,बीओटी तत्वावर देण्याचा विषय असो .किंवा मंगल कार्यालय बीओटी तत्वावर देण्याचा विषय असो .या विषयासाठी सर्वसाधारण सभेची स्वतंत्र मिटींग घेण्यात यावी .त्या मिटींगमध्ये केवळ एकच विषयाची विषय पत्रीका काढण्यात यावी .या पुर्वी विराधी पक्ष नेता ,सभागृह नेता,उमेश चव्हाण यांनी ज्या सुचना केल्या त्यावर विचार करणे आवश्यक आहे .आपण ऑनलाईन टॅक्स वसुल करण्यात आला त्यामुळे केवळ 30ते 35टक्के टॅक्स गोळा झाला .जर वसुली लिपीकामार्फत वसुली केली असली तर आम्ही 60ते 70टक्यापर्यत वसुली गेली असती .आपण ऑनलाईन टॅक्स वसुली केल्यामुळे आपली वसुली कमी झालेली आहे .अनाधिकृत बांधकाम शास्ती लावण्यात आलेली असल्यामुळे लोक टॅक्स भरण्याच्या मनस्थितीत नाहीत .स्थायी समिती सभापती मॅडम यांनी बजेट अंतिम करण्यापुर्वी त्यांनी वरीष्ठ नगरसेवकाशी विचार विनिमय करुन बजेट तयार केले आहे .आपण चार वर्षातुन एकदा मालमत्ता कराचे असेसमेंट करतो .परंतू मालमते मध्ये वाढ होत असते .जसे श्री बंडू खेडकर यांनी सांगीतल्याप्रमाणे मनपाच्या रेकॉर्डवर केवळ एक लाख चार हजार मालमता आहेत . चार वर्षात जी वस्ती वाढ होत किंवा मनपाच्या बॉर्डीवरील जो भाग आहेत त्या एरीयामध्ये सहामहिण्यात 50ते 100घराचे बांधकाम होत आहे .ही घरे पक्के असतील किंवा कच्चे बांधकामाचे असतील हे बांधने सुरु आहे .हे अनाधिकृत बांधकामे आमच्या रेकॉर्डवर येत नाहीत .आणि त्याला मनपाचा टॅक्स लावण्यात येत नाही .झोनल अधिकारी यांनी सतर्क राहीले पाहीजे की कोणत्या ठिकाणी नविन बांधकाम होत आहे त्या घराची नोंद मनपाच्या रेकॉर्डवर घेतली पाहीजे .मागील चार वर्षापासुन फार मोठे अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत ही बाब सर्वांना माहिती आहे.कारण तेरी भी चुप मेरी भी चुप अशी अवस्था आहे नगरसेवक लोक मतदान करुन घेण्यासाठी परेशान असतात .नगरसेवक त्या बांधकाम धारकाचे बाबत तक्रार करीत नाहीत .इमारत निरिक्षक ,क्षेत्रिय अधिकारी यांची एकत्र साठ गाठ असते .क्षेत्रिय अधिकारी यांना माहिती आहे की ,सर्वच बांधकामे हे अनाधिकृत आहेत .बांधकाम परवानगी घेतली तर ते बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे होत नाही . मंजूर नकाशापेक्षा जास्तीची बांधकाम होणार म्हणजे होणार यात शंका नाही .या गोष्टीवर आपण लक्ष घातले तर आपल्या मनपाचे उत्पन्नात निश्चीतपणे वाढ होणार हे बाब तितकीच सत्य आहे . श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सांगीतल्याप्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधी साठी केवळ 10कोटी रुपये खर्च लागतो परंतू ती रक्कम संबधीत कंत्राटदारास देण्यात येत नाही .यामुळे फार मोठया प्रमाणावर नगरसेवकाला त्यांच्या प्रभागामध्ये नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी तोंड दयावे लागते . त्यासाठी ही 10कोटीचा निधी त्यांच्याकरीता ठेवण्यात यावा .श्री बाळासाहेब देशमुख यांनी त्यांच्या वार्डात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे .एमसीएन चॅनलवर प्रत्येक वार्डाची समस्यावर चित्रीकरण करण्यात येते .ते लोकांना दाखविण्यात येते .परंतू वार्डात चांगले काम झाले त्यासाठी यांचा कॅमेरा त्यावर जात नाही .ज्या ठिकाणी केवळ 100मिटरचे काम शिल्लक राहीले आहे त्या ठिकाणचे चित्रीकरण करण्यात येते ,तेच दाखविण्यात येते .माझ्या वार्डात एमसीएनची टीम आली होती त्यांनी त्या वार्डातील नगरसेवकाची प्रतिक्रीया घेणे मुनासीफ समजले नाही .आम्ही त्याच एरीयामध्ये दलीतवस्तीच्या निधीतुन 50लक्षाचे कामे सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने केले आहे .दलितवस्तीचे पैसे वापस जाण्याचे कारण काय होत याबाबत याठिकाणी बरीच चर्चा झाली आहे .आमच्या लेखा विभागाचे अधिकारी व जिल्हाधिकरी कार्यालयाचे अधिकारी यांनी एकत्र बसुन तो दलितवस्तीचा निधी आपल्या मनपाच्या खात्यावर जमा करण्यासाठी प्रयत्न केला असता तर तो निधी परत गेला नसता .प्रशासनातील लोकांना सर्वच बाबी माहिती होत्या त्यांनी यावर उपाय करणे आवश्यक होते . पण त्यांनी ते केलेले नाही. माझ्या मित्रानी पुष्पगुच्छ घेवून आले आहेत ,त्यांचा सत्कार झाला पाहीजे अशी त्यांनी इच्छा होती .रमजाना महिना आहे .अस्सल ची नमाज आज होती .ती नमाज मिटींगमुळे होवू शकली नाही .मला वाटते की ,या ठिकाणी मजाक चालू आहे यांचा सत्कार करा त्यांचा सत्कार करावा .अशा पध्दतीने चालू आहे ही बाब खेद जनक आहे .बजेटची मिटींग चालू आहे त्याकरीता गंभीरतेने विचार विनियमय करणे आवश्यक आहे .तसे होताना दिसून येत नाही , आपण बीओटी तत्त्वावर जे जे कॉम्पलेक्सचे काम केले आहे .त्यामधुन इनकमचा डाटा आपल्याकडे काही तयार केलेला नाही .इनकमच्या डाटयाबाबतचा उल्लेख सुध्दा केलेला नाही .या बीओटीच्या इमारती बांधण्यात येत आहेत त्या इमारती 25वर्षे 30वर्षाच्या लीजवर देण्यात येत आहेत . त्याच्या बदल्यात आम्हाल मोबदला दिसला पाहीजे .परंतू तसे होताना दिसत नाही .एक रस्त्याचा नकाशा तयार होतो आणि राजकीय नेत्याच्या दबावाखाली दुसरा पर्यायी रस्ता सांगितला जातो . आम्ही चांगल्या गोष्टी सांगतो त्यावेळी दबाव आणला जातो .ही बाब योग्य नाही .माझी सभागृहास विनंती आहे की ,आपले बजेट हे गंभीरपणे विचारपुर्वक रियालिस्टीक बजेट तयार करावे .ज्यामुळे की आम्ही आमच्या प्रभागातील लोकांना काही सुविधा देवनू त्यांचे समाधान करु शकू .जे काही

शासनाचे बजेट आहे .मा .आयुक्त सरांना मंत्रालयातला मोठा अनुभव आहे .त्या अनुभवाचा मनपाला फायदा करुन दयावा .ज्या योजना आहेत त्या योजनाचा पाठपुरावा करावा शासनाचा निधी आणण्यासाठी प्रयत्न करावे. आता शासनाची एक योजना आहे की सर्वासाठी घरे हा विषय मागील 4 ते 5महीण्यापासुन पेडींग ठेवण्यात येत आहे .त्याचे कारण असे की ,कधी आयुक्त व महापौर यांचे जमले नाही .कधी कोणाला या ठिकाणी बसविण्यात आले .आम्ही गरीब वस्तीचे प्रतिनीधीत्व करीत आहोत .मागील एका वर्षापासून कार्यकारी अभियंता यांना विचारना करीत होतो की ,रमाई आवास योजनेचा निधी आहे माझ्या प्रभागामध्ये दलितासाठी घरे देता आली असती .यासाठी मी पाठपुरावा करीत होतो ,कार्यकारी अभियंता म्हणत होतो .परंतू कार्यकारी अभियंता म्हणायचे की ,गफार भाई जाने दो ना .असे ते म्हणत होते आता काय करायचे आहे .सर्वासाठी घरे या योजनेत आम्ही आपल्या प्रभागातील एकही घर सोडणार नाही .कशाला विचार करता .असे सांगण्यात येत होते . आम्ही लोक प्रतिनिधी आहोत .आम्हाला लोकामध्ये जावून बसण्याची ताकद राहीलेली नाही .खोटे बोलून-बोलून जवळपास सव्वा वर्ष निघून गेले आहेत .आम्ही सर्वासाठी घराची अंमलबजावणी करु शकलो नाही .दलित वस्तीचे रु 10.60.कोटीचा निधी मागील 6ते 7महीणे आमच्या महापौर व पदाधिकारी यांच्या विचाराधीन प्रश्न राहीला आहे .कोणाचे किती ,कोणाला किती याचा केवळ विचार केला गेला आहे .आम्ही नांदेडचे प्रिन्स यांच्या सोबत चर्चा करुन अंतिम करण्यात येईल . सर्वसाधारण सभेस यादी अंतिम करण्याचा अधिकार आहे .श्री विरेद्रसिंघ गाडीवाल यांनी सुचना केली गेली हे करण्यात यावे .ते करण्यात यावे आणि बजेट अंतिम करण्याचे अधिकार महापौर यांना देण्यात यावे .आमचे मित्र श्री बंडू खेडकर यांनी एक विषयावर मनापाच्या अनुदानाची आवश्यकता नाही असे म्हणाले होते त्यावर याठिकाणी त्यांना टोकण्यात आले .

**गोधंळ चालू होता.**

**सभागृहनेता** — मा.महापौर साहेब विषय दुसरेकडे जात आहे विषयपत्रिकेवरच चर्चा करण्याचे स. सदस्यांना आदेशीत करण्यात यावा.

**विनय गिरडे** — विषय दुसरीकडे जात आहे .विषयाला धरुन बोलावे.

**गफार खान** — मी बजेटच्या संदर्भात बोलत आहे बजेटमध्ये उल्लेख आहे म्हणून बोलत आहे.

**विरोधी पक्षनेता** — आकृतीबंधाचा विषयी आम्हाला पुर्णपणे माहिती झालेला नाही तो विषय सोडून विषय पत्रीका पास करण्यात यावी. तसेच कत्तलखानाचा विषय नामंजुर करण्यात यावा तसेच त्यावर शिवसेना पक्षाचा विरोध नोंदविण्यात यावा

**फारुख अली खाँ** — विरोधीपक्षनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहेत.

**स. शेर अली** — आकृतीबंधाचा विषय सोडून विषय पत्रीका पास करण्यात यावी.

**अशोक उमरेकर** — विषय पत्रीकेत जो कत्तलखान्याचा विषय आहे तो विषय आताचे आता रदद करण्यात यावा . कत्तलखान्याचा विषय पास करण्यात येवू नये. त्यास शिवसेना पक्षाचा विरोध नोंदविण्यात यावा

**तुलजेश यादव** — श्री अशोक उमरेकर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे

**सभागृहनेता** — अंदाजपत्रक अंतीम करण्याचे अधिकार, दिनांक ११.०५.२०१६ सभेची विषय पत्रिका व पुरवणी विषय पत्रिका तसेच दिनांक २९.०२.२०१६ ची पुरवणी विषय पत्रिका पास म्हणुन त्यात कांही दुरुस्ती करण्याचे अधिकार मा. महापौर यांना देवुन सभा संपण्यात यावे अशी विनंती आहे.

**अ. सत्तार** — सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

( श्री अशोक उमरेकर, श्री गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल व श्री बाळासाहेब देशमुख या स. सदस्यांनी मासांचे तुकडे आणुन टाकले. )

**गोंधळ सुरु होता.**

**महापौर** — स. सदस्यांनी केलेल्या चर्चे प्रमाणे स्थायी समितीने केलेल्या शिफारशीच्या ठराव मध्ये आवश्यकते फेरफार व दुरुस्ती करुन सालसन २०१५-१६ व सालसन २०१६-१७ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. तसेच दिनांक ११.०५.१६ व २९.०२.१६ ची विषय पत्रिकेच्या अनुषंगाने ठरावात अंशता दुरुस्त्या करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र .०३** **ठराव**

स्थायी समिती ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दिनांक ०५.०३.२०१६ ठराव क्र .२३६ अन्वये शिफारस केलेले सन २०१५-२०१६ चे सुधारीत अर्थसंकल्प जसेच्या तसे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मंजुर करते,

तसेच स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१६-२०१७ चे मूळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून स्थायी समितीने शिफारस केलेल्या उर्वरीत अंर्थसंकल्पास तसेच आयुक्तांच्या प्रस्तावास जसेच्या तसे ही नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो .

**सालसन २०१६-२०१७ चे मुळ अर्थसंकल्प जमा बाजू**

| अ.क्र | लेखाशिर्ष | आयुक्तांनी सूचवलेली तरतूद | स्थायी समितीने सूचवलेली तरतूद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | स्थानीक संस्थाकर अनुदान | -- | ६०,००,००,००० | ८६,५१,५०,००० |

**सालसन २०१६-२०१७ चे मुळ अर्थसंकल्प खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा.आयुक्त यांनी सूचविलेली तरतुद | स्थायी समितीने सूचविलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | शहरातील भुजल पातळी वाढविण्याकरिता जलपुर्नरभरण कार्यक्रम राबविणे | -- | २०,००,००० | २,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | जेनेरीक औषधी खरेदी करणे | -- | --- | १,००,००,००० |
| ३ | मनपा शाळे मध्ये सेमी इंग्रजी माध्यम शाळा सुरु करणे | ५०,००,००० | १,००,००,००० | १,२५,००,००० |
| ४ | क्षेत्रीय कार्यालय-क साठी फर्नीचर खरेदी करणे | -- | -- | ४०,००,००० |
| ५ | नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापनसाठी Sound Meter खरेदी करणे | -- | --- | ७५,००,००० |
| ६ | श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे | १,००,००,००० | १,००,००,००० | ५,००,००,००० |
| ७ | स. सदस्यांच्या शिफारसीसह भांडवली जमा मधुन प्रत्येक प्रभागात विकास कामे करणे | | २५,८०,००,००० | ३४,४०,००,००० |
| ८ | मनपा तर्फे वृक्षरोपन लागवड व संगोपनासाठी ट्री गार्ड खरेदी करणे | ५०,००,००० | ७५,००,००० | १,००,००,००० |
| ९ | अपंग कल्यानकारी योजना ३% खर्च करणे | १०,००,००० | १०,००,००० | १,४९,००,००० |
| १० | कै. शंकररावजी चव्हाण कमानीचे बांधकाम करणे | -- | -- | ५०,००,००० |
| ११ | श्री गुरुगोविंदसिंघ जयंती सोहळा कार्यक्रम आयोजन करणे | -- | -- | १,००,००,००० |
| १२ | क्रिडा प्रबोधनी स्पर्धाचे आयोजन करणे | ५,००,००० | ५,००,००० | १०,००,००० |
| १३ | कौठा येथे अजिंठा बुध्दविहारचे बांधकाम करणे | २,००,००,००० | २,००,००,००० | १०,००,००० |
| १४ | जुने ट्रेचिंग ग्राऊंडचे सपाटीकरण करणे व त्या जागेत उद्यान विकसीत करणे | -- | -- | १,००,००,००० |
| १५ | खुदवाईनगर इदगाह ग्राऊंडचे सुशोभिकरण करणे | -- | -- | २५,००,००० |
| १६ | लिंगायत स्मशानभूमी विकसीत करणे | -- | -- | २५,००,००० |
| १७ | मनपा सहभाग | -- | २,००,००,००० | ३,००,००,००० |
| १८ | इंदिरागांधी मैदान विविध खेळाकरीता विकसीत करणे | -- | -- | २५,००,००० |
| १९ | अबचलनगर भागात नविन मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी | -- | २५,००,००० | १,००,००,००० |
| २० | शहरातील मोकळया जागेत लहान मूला करीता किडस प्ले ग्राऊंड विकसीत करणे | -- | -- | २५,००,००० |
| २१ | मनपा तर्फे स्पोर्ट अन्ड रिक्रेशन सेंटर विकसीत करणे | -- | -- | १०,००,००० |
| २२ | रामघाट स्मशानभुमि विकसीत करणे | -- | -- | ५,००,००० |
| २३ | प्र.क्र.२९ पोलिस स्टेशन मागे महानगरपालिकेच्या मोकळया जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स व जिमचे बांधकाम करणे | -- | -- | २५,००,००० |
| 2४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करणेसाठी | ५,००,००० | ५,००,००० | १०,००,००० |
| २५ | रमजान सणानिमित्य इफतार पार्टीचे कार्यक्रमाकरीता | -- | -- | १,००,००० |
| २६ | महानगरपालिका अर्थसंकल्पीय विशेष सभेकरीता उपस्थित सदस्यांना जेवण व अल्पोपहार करण्यासाठी | --- | --- | १,५०,००० |
| २७ | पर्यावरण विषयक २५ टक्के प्रमाणे भांडवली खर्च | ४,५०,००,००० | ४,५०,००,००० | ८,५०,००,००० |
| २८ | मनपा स.सदस्यांना सुटकेस देण्यासाठी | -- | -- | ५,००,००० |
| २९ | वैद्यकिय उपकरणे व इतर साधनसामुग्री खरेदी करणे | १०,००,००० | १०,००,००० | २५,००,००० |
| | एकूण | | ३७,८०,००,००० | ६४,३१,५०,००० |

तसेच आयुक्तांनी अंदाजपत्रकात दिलेल्या खालील प्रस्तावास मान्यता देण्यात येते .

१( नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हददीतील मालमता कर आकारणी भांडवली मुल्याधारीत पध्दतीने करण्यात आली असुन सदरील कर आकारणी करताना मागील भाडेपध्दतीने लागु होणारे कराच्या निवासी इमारतीस दुप्पटीपेक्षा जास्त कर व अनिवासी इमारतीस तिनपटीपेक्षा जास्त कर लागणार नाहीत, असे वापर भारांक गुणोत्तर करुन प्रत्येक इमारतीचे कर मुल्यांकन निश्चीत करण्यात आले व त्यानुसार कर आकारणी केली होती, तथापी शहरातील काही अभ्यासु नागरीकांनी कमर्शियल वा व्यावसायीक वर्गवारीच्या इमारतीस रेडीरेक्नर मध्ये दर दिलेले असताना वापर भारांक दोन लावण्यास आक्षेप नोंदविला होता तो मान्य करुन कमर्शियल इमारतीस अनिवासी वापराच्या भागास भारांक दोन ऐवजी एक करण्याचे मागील अर्थ संकल्पात प्रस्तावीत केले होते, त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली आहे, त्यामुळे अशा इमारतीस मालमता कर व अनुषंगीक कर कमी झाले आहेत, त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट होत होती व निजी वापर प्रकारच्या इमारतीच्या अनिवासी वापरातील इमारतीच्या करापेक्षा कर कमी लागु झाले आहेत त्यामुळे, व्यावसायीक वा कमर्शियल इमारतीचा कर महानगरपालिकेच्या हददीतील निजी व्यावसायीक वापर प्रकार असणा-या मालमताच्या करापेक्षा कमर्शियल इमारतीच्या कराची मागणी कमी होत असल्याने या वर्गवारी ज्यांचा वापर भारांक एक करण्यात आला आहे त्या इमारतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण् ११ नियम ९९ नुसार खालील दराने साल सन २०१६.१७ पासुन आकारणी करण्याची मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १ सामान्य कर | ०.३% |
| २ वृक्षकर | ०.०१% |
| ३ मनपा शिक्षण कर | ०.०१९% |
| ४ पथकर | ०.०१९% |
| ५ जललाभकर | ०.०३८% |
| ६ जलनिस्सारणकर | ०.०३८% |
| ७ अग्नीशमनकर | ०.०३८% |
| ८ साफसफाईकर | ०.०१९% |

यानुसार कमर्शियल वर्गवारीच्या इमारतीस कराचे दर लागु राहतील जे साल सन २०१६.१७ पासुन लागु होतील .

तसेच कर वसुली करीता सुट व शास्ती योजना खालील प्रमाणे मान्य करण्यात येते

| अनु क्रं. | माहे | महानगरपालिकेच्या करावरील सुट | मागणी करण्यात आलेल्या सर्व करावरील शास्ती |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | १० टक्के | थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| २ | मे २०१६ | ९ टक्के | थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| ३ | जुन २०१६ | ८ टक्के | थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| ४ | जुलै २०१६ | ७ टक्के | पुर्ण थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| ५ | ऑगष्ट २०१६ | ६ टक्के | पुर्ण थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| ६ | सप्टेबर१६ | ५ टक्के | पुर्ण थकबाकीवर २ टक्के शास्ती |
| ७ | ऑक्टोबर २०१६ | निरंक | थकबाकीवर व प्रथम सहामाही करावर २ टक्के दरमहा शास्ती |
| ८ | नोव्हेंबर २०१६ | निरंक | थकबाकीवर व प्रथम सहामाही करावर २ टक्के दरमहा शास्ती |
| ९ | डीसेबर २०१६ | निरंक | थकबाकीवर व प्रथम सहामाही करावर २ टक्के दरमहा शास्ती |
| १० | जानेवारी २०१७ | निरंक | थकबाकीवर व चालु वर्षाच्या पुर्ण करावर २ टक्के दरमहा शास्ती |
| ११ | फेब्रुवारी २०१७ | निरंक | थकबाकीवर व चालु वर्षाच्या पुर्ण करावर २ टक्के दरमहा शास्ती |
| १२ | मार्च २०१७ | निरंक | थकबाकीवर व चालु वर्षाच्या पुर्ण करावर २ टक्के दरमहा शास्ती |

तसेच साल सन २०१५-१६ मध्ये मालमताधारकांना थकबाकीवरील २०१४-१५ अखेरच्या थकीत शास्तीमध्ये ५० टक्के सुट देण्यात आली होती ती सुट व सन २०१५-१६ चा कर मार्चपुर्वी न भरल्यामुळे लागु होणारी शास्ती माहे एप्रिल व मे २०१६ पर्यंत ज्यांनी थकबाकीसह ( २०१६-१७ ) चालु वर्षाचा पुर्ण कर भरणा करतील त्यांना २०१५-१६ च्या करावर लागणारी शास्तीमध्ये १०० टक्के व थकीत शास्तीमध्ये ५० टक्के सुट देण्यात येते याची व्यापक प्रसिध्दीही करण्यास मान्यता देण्यात येते.

(1) तसेच स .सदस्यांच्या शिफारशीनुसार त्यांच्या प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी व्यवसाय परवाना शुल्काची रक्कम व मालमत्ता करातुन मिळणा-या उत्पन्नापैकी प्रतिमहा रु 1.00 .कोटी रक्कम वार्ड विकास निधी या नावाने बॅंकेत जमा करुन वार्ड विकास निधीची कामे करण्यास मान्यता देण्यात येते.

2) नागरीकांना मालमत्ता कराची मागणी बिल घरोघरी जावून देण्यात येते म्हणुन आकारण्यात येत असलेले रु .२० -/सेवा शुल्क रद्द करण्यास मान्यता देण्यात येते.

3 ) संस्थांना सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणेसाठी महानगरपालिकेतर्फे अनुदान दिल्या जाते यापुढे ज्या कार्यक्रम संस्थेने आयोजित केला त्याचे एकूण खर्चापैकी १० टक्के किंवा रु. ५०,०००-/ यामध्ये जी कमी असलेली रक्कम देण्यात यावी अशी मान्यता देण्यात येते.

4( शहरातील विविध जाती धर्माच्या धार्मीक उत्सवास व सामुहिक विवाह मेळाव्यास संबंधित आयोजकाच्या विनंतीनूसार विनामुल्य अग्नीशमन सेवा पुरविण्यास मान्यता देण्यात येते.

5 ( नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सन्माननीय सदस्यांना चांगल्या प्रतीच्या सुटकेस देण्यासाठी लागणारा अंदाजीत खर्च रु.५.०० लक्षाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते ,सदरील सुटकेस या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या पुस्तकासोबत देण्यात याव्यात असे ही नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते संमत करते .

**महापौर** वरील सभागृहाने सुचविल्यानुसार सदरच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे दिनांक ११.०५.२०१६ सभा विषयपत्रीका घेण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

स्वाक्षरीत/-
**महापौर**
नावाशमनपा नांदेड